# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख २ माहे फेब्रुआरी सन १८८० इसवी. अंक ५

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | रु० |
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ०१०१ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## मुंबई व्यांक.

अमानत ठेविलेल्या पैशावर व्याजाचे दर.

१२ महिने ठेविल्यास दरसाल दर शेकडा ४ रुपये.

६ महिने ठेविल्यास (ह्मणजे तारीख १ नोवेंबर पासून ता० ३० जूनपावेतों एकसारखे कोणतेही सहा महिनेपर्यंत दरसाल दर शेकडा ३ रुपये प्रमाणें.

सदर्हू प्रमाणें न ठेविल्यास दरसाल दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज मिळेल.

तात्पुरची किंवा मुदाम व्यवस्था केल्याशिवाय कमी मुदतीपर्यंत अथवा अधिक व्याज. ने. अमानत पैसा ठेविला जाणार नाहीं.

चालू अमानत पैशाच्या खात्यावर व्याज दिलें जाणार नाहीं.

मुंबई.

तारीख १ आगष्ट सन १८७९ इसवी.

विक्रीस तयार.

## हिशेब रत्नमाला किंवा कुट्टक गणित.

नवीन प्रकारचें पुस्तक.

हे पुस्तक सुंदर टाइपानें छापून विक्रीस तयार झालें आहे. याची किंमत १३ आणे असून याचीं पृष्ठें सर्व १८२ चतुष्पत्री मोठ्या साचाचीं आहेत. यांत पांच भाग आहेत बाहेर गावीं मागणारांस टपाल खर्च शिवाय एक आणा पडेल. १० प्रति मागणारांस एक प्रत कमिशन मिळेल. या पुस्तकाची किंमत सर्वांच्या सोयीसाठीं फार थोडी ठेविली आहे हें पुस्तक पाहिल्यानें ध्यानीं येईल. प्रत्येक मास्तरांनीं हें पुस्तक संग्रहीं ठेवण्यास फार योग्य आहे.

नाटपेड पत्र पाठवूं नये. पैसा टिकेट असल्यास वर्तीळ्यासुद्धां पाठवावा पोस्टांतून पैसा पाठविण्याची सोय उत्तम झाली आहे.

सदर्हू पुस्तकें खालील पत्यावर आज्ञांकडे अथवा वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मिळतील. कळावें ता० २४ जानेवारी १८८० इसवी.

नारो रघुनाथ मोहोळकर
मास्तर, ट्रेनिंग कालेज अकोलें.
प्रांत वऱ्हाड.

## सुबोधसार.

भाग पाहिला.

यांत राजनीति वगैरे अनेक ग्रंथांतून नीतिपर, बोधक, मनोरंजक, दृष्टांतिक, व अनुभवसिद्ध असे उत्तम निवडक श्लोक प्राकृत अर्थासह घेतले आहेत. अशा ग्रंथाच्या अवलोकनानें बहुतेक व्यवहारज्ञांस विशेषेंकरून नीतिशास्त्र वगैरे विषयांची चांगली माहिती होऊन सामान्य पुरुषासही व्यवहारांत समय विशेषीं कसें बोलावें व वागावें वगैरे अनेक प्रकारचें ज्ञान होण्यासारखें आहे ग्रंथ जाड कागदावर खिळे छापानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ०१० आणे टपाल खर्च ०६ आह्माकडे पाठविल्यास पुस्तक तावडतोब रवाना केलें जाईल. कळावें. ता. २६ आक्टोबर सन १८७९ इ.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांनां आग मुळींच होत नाहीं औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें किंमत ०६ आणे.

हें औषध गजकरण शिवायकरून खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

या गजकरणाच्या औषधाच्या डब्या २ वर्षांपूर्वीं आमचे छापखान्यांत विक्रीकरितां होत्या व त्यांपासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलिकडे सदर्हू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिल्लक नव्हत्या व तेणेंकरून यारोगानें पीडलेलीं गिऱ्हाइकें परत गेलीं ह्मणून आह्मी त्या औषधाच्या डब्या मुदाम आणिल्या आहेत.

## नादारी प्रकरणी नियम.

वऱ्हाडांत नादारी संबंधी जो कायदा हल्लीं चालू आहे व ज्याच्या प्रति मे० जुडिशियल कमिशनर साहेबांनीं सरकारी कचेऱ्यांतून वहिवाटीकरितां छापून दिल्या आहेत तीं पुस्तकें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किंमत आठ आणे. बाहेरगावीं पाठविण्यास एक आणा अधिक लागेल.

COMEDY OF ERRORS.

## कामडी आफ एरर्स.

अथवा

## भ्रांतिकृतचमत्कार.

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरलेला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे. असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हशिलाबद्दल अर्ध आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## महामारी.

हा भयंकर रोग सर्वत्र प्रसिद्ध आहे त्या विषयीं चांगली माहिती होणे व त्यावर वक्तशीर उपाय योजणें फार अवश्यक आहे. ह्मणून मिरज संस्थानचे मेडिकल आफिसर रा. रा. त्रिंबक सखाराम सिरवळकर एल. एम. यांनी या विषयावर एक लहानसें उत्तम पुस्तक तयार केलेलें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहे. किंमत सहा आणे. बाहेर गावी नेणारास एक आणा अधिक पडेल.

## कृषिकर्मविद्या अथवा शेतीचें वर्णन.

हा सुमार साडेपांचशें पृष्ठांचा मराठी ग्रंथ ग्रंथोत्तेजक मंडळीकडून नुकताच छापून तयार झालेला प्रसिद्धीस आलेला आहे. हा विषय मोठ्या महत्वाचा असून ग्रंथांतील माहिती फार शोधकपणानें लिहिलेली आहे. याच्या प्रति वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. किंमत ३॥ रुपये व डांकहशील ०४

## नोटिस.

दत्तुजी वल्लद भगाजी बोरकर रहाणार मौजे दाभ प्रगणे व तालुके मंगरूळपीर जिल्हे वाशीम यास रुखमाई मर्द दत्तु रहाणार मौजे भडशिवनी तालुके मूर्तिजापुर जिल्हा उमरावती इजकडून नोटिस देण्यांत येते कीं पांच वर्षे झालीं मी आपले बापाचे एथें आहे तूं मला घेऊन जात नाहीं व मला खाण्यापिण्यास देत नाहीं करितां सावकार लोकांचें कर्ज काढून उदरनिर्वाह केला. सबब दरसाल रुपये ५० प्रमाणें ५ वर्षांचे २५० रुपये देऊन मला घेऊन जावें नाहीं तर मी दुसरा पाट करून संसार करीन. मग माझेवर तुझा कोणतेच प्रकारचा हक्क चालणार नाहीं हि नोटिस पावल्यापासून एक महिन्याचे आंत सदर्हू नोटिसींत लिहिल्याप्रमाणें अमलबारी करावी कळावें. तारीख २७ जानेवारी सन १८८० इसवी.

(सही) रुखमाई मर्द दत्तुजी इचे
हातची निशाणी बागडी.
दस्तुर नारायण खंडुजी
रहाणार मंगरूळपीर.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

रा. रा, वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. मागें पंढरपुरचे प्रवासांतील दौंड मनमाड रेलवेची थोडी माहिती कळविली होती व अधिक हकीकत पुढें सादर करीन ह्मणून कबूल केलें होतें त्याप्रमाणें सादर करितें उशीर लागल्याबद्दल माफी असावी.

या दौंड मनमाड स्टेट रेलवेच्या योगानें वऱ्हाडांतील लोकांस पंढरपुरास जाणें पूर्वी पेक्षां अधिक सोयीवार झालें आहे. ह्मणने चार्ज फार थोडा लागतो. तथापि मनमाडाहून सकाळीं गाडी निघते ह्मणून एक मनमाडास व दुसरा दौंडास असे मध्यंतरी बरेच गैर सोयीचे मुक्काम होतात ज्या ठिकाणीं नेहमी शेंकडो लोकांचे मुक्काम होणार तेथें त्यांचे निर्वाहापुरती तरी सोय पाहिजे. मनमाडास सोय बरी आहे. दौंड एथें एक लहानशी धर्मशाळा स्टेशनापासून थोड्या अंतरावर आहे पण तेथपर्यंत जाण्याला सडक असो पण साधारण रस्ताही बरा नाहीं; उंच सखलांतून व नाल्या खोल्यांतून जावें लागतें बरें तेथें गेल्यावर जागा रगड नाहीं, व पाणी जवळ नाहीं तेणें करून प्रवाशाला बहुतकरून येथें उपवासच करण्याची पाळी येते व मोठा त्रास पडतो ह्मणून इकडे योग्य अधिकारी लक्ष्य देऊन प्रशस्त धर्मशाळा, बावडी, व रस्ता ह्या साधारण सोयी करतील अशी आशा आहे.

दौंडाहून कुर्डूचे वाडीस आलों हें स्टेशन जरी लहानच आहे तरी एथें धर्मशाळा, गोडेपाण्याच्या पायविहिरी व बाजार ह्या तिन्ही हो सोयी उत्तम आहेत व तेणेंकरून मागील सर्व शीणभाग हरण होतो. एथून पंढरपुर ३१ मैल राहातें तरी इकडे बैलगाडी इतकी स्वस्त आहे कीं, ४ आणे घेऊन एका मनुष्यास पंढरपुरास पोंचवितात. मध्ये दोन ठिकाणीं गाड्याच्या दस्तुरीचीं नाकीं आहेत तरी सडक चांगली पहिल्या प्रतीची बांधलेली नाहीं. मागील दुष्काळाचे योगानें बऱ्याच जमीनी पडीत झाल्या आहेत. क्वचित पिकें बरीं होतीं व त्यांवरही हिवानें आपली झडप घातली होती.

पंढरपुर— हें क्षेत्राचे ठिकाण आहे येथें भीमा नदी वाहत असून इला " चंद्रभागा " ह्मणतात. एथें मुख्य दैवत श्री पांडुरंग असून त्याच अनुषंगिक राही, रखुमाबाई, महालक्ष्मी, बालाजी, दत्तात्रय, मुर्लीधर, नामदेव, चोखामेळा, राम, महादेव, खंडोबा, पंचमुखी मारुती यांचीं देवालयें गावांत व चंद्रभागेत पुंडलिक, नारद, विष्णुपद इत्यादि देवळें व स्थानें आहेत एथें एकंदर बडवे पुजारी व सेवाधारी असे तीन मुंड हक दार आहेत व यांचे नेहमी तंटे चालू असतात पंढरपुर हें मोठें शहर जरी नव्हे तरी एके दिवशीं ब्राह्मणांचीं दोन तीन सहस्त्र भोजनें सहज होतात. एथील कुंकू, बुक्का, व दशांग याची बरीच दूर आख्या आहे व दुकानेंही बरीच आहेत पण हल्लींचे युगाप्रमाणें त्यांत बरीच ढकलपट्टी निघून दुकानदाराचें लक्ष्य गिऱ्हाईकास वाईट माल देऊन फसविण्याकडे अधिक आढळतें तेव्हां हें पेठेच्या प्रख्यातीस झा

लेल्या नावास मागें पुढें न्यूनत्व आणिल कीं काय न जाणो.

एथें म्युनिसिप्यालिटीची व्यवस्था बरी दिसली. सर्व गावांत नळाचें पाणी खेळविलें असून आळेआळीला रात्रीचे कंदील लावितात. वस्ती जरी मोठ्या दाटीची आहे तरी मोरींचें पाणी गावांत कोठें दृष्टीस पडत नसून चंद्रभागेंत काढून दिलें आहे.

दुष्काळाला जरी दोन वर्षे लोटलीं तरी एथें गोपाळपुरीवर २००० गोरगरीब लोकांस सरकारांतून भाकरी वाटल्या जातात. व मागील दुष्काळांतील निराश्रित मुलांचे संगोपन एथील म्युनिसिपाल कमीटीनें करून ती हल्लीं त्या सर्वांस स्वतंत्र शाळेंतून विद्यामृतपान करवित आहे ही मोठी संतोषाची गोष्ट होय. कळावें. तारीख २९ माहे जानेवारी सन १८८० इसवी.

आपला
एक यात्रेकरू.

### कालिदास नाटक.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः--

वि. वि. आपले एथें हल्लीं रा. रा. नाना भाई धैर्यवान मुंबईकर यांनीं कालिदास पुणेकर हिंदु स्त्री मिश्रनाटक आणिलें आहे व यांचे खेळ चालले आहेत. त्या संबंधानें दोन ओळी आपणाकडे लिहून पाठविल्या आहेत यांतील मतें आपल्या विरुद्ध असलीं तरी सर्व लोकांचे समजासाठीं कृपाकरून छापण्याची तजवीज करावी.

आपण जें जें नाटक एथें येतें व त्याचे खेळ चालू असतात त्याची त्याची त्या त्या प्रसंगीं स्तुतीच करीत असता व त्याप्रमाणें च नाना भाई यांच्या नाटकाच्या स्तुतीचे पवाडेही आपण गाईले आहेत. पण याविषयीं रसिक व अभिज्ञ लोकांचें मत तद्विपरित आहे. हें त्यांनां कळावें व त्यांनीं आपल्या नाटकाची सुधारणा करावी असें माझें मत आहे. आपणही सदर्हू नाटकाचे चांगुलपणाविषयीं लिहितांनां शेवटास लिहिलें आहे कीं, " यांत कांहीं दोषही आहेत. " पण एवढ्या मोहगम लिहिण्यानें आपण त्यांच्या स्तुतीचा फड मारून नेला व दोषाविष्करण केलें नाहीं त्यामुळें त्यांनां सुधारणेस सूचना कांहीं झाल्या नाहींत व लोकही मुग्ध राहिले सबब त्यांचे दोष दाखवावे व अशाच प्रकारचें नाटक पुढें चालविण्यांत नानाभाई यांस व लोकांस पुढें कांहीं फायदा आहे किंवा कसें तें विश्रुत करावें असा माझा हेतु आहे.

नानाभाई यांचे हल्लींचे नाटकांत पडदे फार चांगले आहेत. देखाव्याकरितां बगीच्याचे सामानाची व शेषशायी, सिंव्ह, वाघ वगैरेचीं चित्रें चांगलीं आहेत. उजेड चांगला असतो. व भपका मुंबईचा आहे हाच विशेष सद्गुण. बाकी नाटक पात्रांत एक विदूषक, समेया घेऊन नाचणारी एक स्त्री, व एक दोत, फडके आणि आणखी दोन गृहस्थ एवढींच पात्रें जमेस धरण्यासारखीं आहेत. बाकी खोगीरभरती जमविलेली आहे त्यापासून नाटकात विशेष रंग किंवा शोभा ह्मणण्यासारखी नाहीं असें बहुतेकांचें मत आहे.

स्त्रीमिश्रित नाटक ही आख्या मात्र मोठी आहे पण सारी एकच स्त्री यांचे नाटकांत आहे. ती आळसत आळसत थोडें गाते व समया हातावर आणि डोक्यावर घेऊन नाचेत व लहानसर असून थोडी देखणी आहे हाच काय तो तिचा सगुण. बाकी भाषणें तिनें कधिं लांबलचक केलीं वै त्यांत लोकांचीं मनें उचबंळलीं असें ४।५ झालेल्या खेळांत कांहीं कोणाचे दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं. तो गुण तिजमध्यें नाहींच व बाकी स्त्री पार्ट तर बिलक्षण आहे. हें प्रमिलेची कचेरी ज्यांनीं यांची पाहून इचलकरंजीकरांची पाहिली त्यांनां चांगला दिसून आला; यांच्यांत स्त्रियांची सोंगें घेणारांत सुबकपणा व सारखेपणा कोठेंच कांहीं दिसून आला नाहीं. व भरतीकरितां ४ विती व ५ विती उंचीचे पोरें देखील त्यांत सामील केलीं होतीं ह्मणून तो भाग फार पोरकट दिसला. व त्यांत सुधारणा जरूर झाली पाहिजे.

दर नाटकास फार्स करण्याचा यांचा संप्रदाय आहे. त्यांत एक दोन बरे झाले. बाकींत कांहीं चेंगट व कांहीं फारच अनीतीचे व अमर्यादपणाचे इतके होते कीं सहृदय मनुष्यांस त्यांचा तिटकारा आला मग कुल स्त्रियांस ते पाहून काय वाटलें असेल याची कल्पना करावी.

एक दोन पात्रें रासिक भाषण करणारीं चांगलीं आहेत पण " सांगतों श्रवण कर" या मुक्कामाच्या मजल्यांनीं त्यांच्या भाषणाचा रसाविर्भाव सर्व निघून जातो सबब ते मुक्काम गाळून चांगल्या भाषण करणाराची सूत्रधारासी गाठ पडूं न देतां त्यांनां रेल्वे मार्गासारखा सफा बोलू दिलें पाहिजे. व तशीं रसाळ भाषणें पुष्कळ होतील व तसे वक्ते पुष्कळ असतील तरच नाटकाची खरी थोरवी आहे. एरवी भपक्यांत कांहीं विद्वत्ता नाहीं. साधारण लोकांची कर्मणूक मात्र होते. अस्तु; धैर्यवान यांनीं धैर्य खचवू नये त्यांस आणखी २ ओळी पुढील पत्रीं लिहीन ही विनंती कळावें तारीख ३१ माहे जानेवारी सन १८८० इसवी.

एक
"प्रेक्षक"

---

## वऱ्हाडसमाचार.

मिति पौष कृष्ण ६ शके १८०१

---

## धर्मशाळेजवळ विहीर.

चांगल्या कामाला सुरुवात केली ह्मणजे परमेश्वर यश देऊन तें काम 'दुधांत साखर' याप्रमाणें अधिक चांगलें करवितो. ही गोष्ट आमचे मे० दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. यांच्या धर्मशाळेच्या उद्योगास अधिक यश येत गेल्यावरून आह्मास स्मरून फार संतोष होतो. कृपाळु परमेश्वर त्यांकडून असेच सदुद्योग निरंतर करवो व त्यांत असेंच त्यांस यश येवो.

मे० पेस्तमजी विकाजी शेट यांची जुनी धर्मशाळा अकलकोटाकडे एका अंगास असलेली सर्व लोकांचे सोयीकरितां गावचे मध्यावर आणावी ही गोष्ट प्रथम त्यांनीं मनांत आणिली त्यावेळीं तिचें सर्व सामान सिद्ध आहे फक्त मजुरी खर्च लागेल तो हजार बारा शें रुपयेंपर्यंत केला ह्मणजे पुरे आहे असें त्यांस वाटून त्यांनीं तितक्यापुर्ती तजवीज करण्याचा घाट घातला व लोकांनीं हौसेने त्यांच्या हेतूस सहाय केलें. पुढें जुन्या धर्मशाळेचें सामान काढून आणून सुरुवातीचा समारंभ केला तेव्हां त्यांस वाटलें कीं, काम सुबक दिसण्यासाठीं त्यांत कांहीं न्यूनाधिक करावें व ती गोष्ट मंडळीस कळवितांच त्यांसही सर्वांचा रुकार पडून तीन हजार रुपये पर्यंत वर्गणी जमा झाली. व उत्तम रीतीनें धर्मशाळेचें काम चालू झालें. मे० बहिमनजी साहेब या कामास लाकडें पाहिजे होतीं त्यांच्या खरेदीकरितां स्वतां नागपुरास गेले होते व तिकडून त्यांनीं लाकडांची खरेदी करून आणिली. दररोज प्रहर दाहा घटिका त्या कामाचे देखरेखीवर राहून काम अगदीं तयारीस आणिलें. दोन तीन आठवड्यापूर्वीं हिशेब पाहतां सात आठ शें रुपये आणखी पाहिजेत असें त्यांस वाटल्यावरून उदार लोकांनीं तितक्या रकमेची आणखीही तजवीज करून दिली. तेणेंकरून त्यांस फार संतोष होऊन मोठ्या उल्हासानें त्यांनीं धर्मशाळेचें काम चालविलें. इतक्यांत त्यांस आणखी परम संतोष होण्याजोगी गोष्ट या आठवड्यांत घडून आली ती अशीः—

एवढी मोठी धर्मशाळा तयार झाली, ती मोठ्या नाक्याचे जाग्यावर झाली, सर्व लोक तिची तारीफ करूं लागले, हजारो लोकांस तिजपासून आराम होईल असें दिसूं लागलें, पण शेवटीं त्यांस तिजमध्यें एक न्यून वाटलें तें हें कीं धर्मशाळेला जोडून विहीर नाहीं. आपण एवढा उद्योग केला व प्रवासी लोकांस सुख देण्याचें मनांत आणिलें पण त्यांस अंधारे रात्रीं नदीवर पाण्याकरितां ठेंचा खात जाण्याचा त्रास होणारच; तेव्हां एवढ्या मोठ्या योजिलेल्या सुखाच्या कामास थोडें हीनत्व येत आहे असें पाहून त्यांनीं अकोल्याच्या वकील मंडळीकडे ही गोष्ट काढली तेव्हां जणू कांहीं ईश्वरीप्रेरणा त्यांचे हृदयांत पूर्वींच झालेली असावी अशासारखें त्यांनीं तोंडांतून शब्द काढण्याचा मात्र अवकाश सर्व वकील मंडळींनीं एक समयावच्छेदेंकरून मोठ्या उल्हासानें व उदार मनानें सदर्हू विहिरीस लागेल तो सर्व खर्च आह्मी वकील मंडळींतून देतो; आपण विहिरीचे काम सुरू करावें असें त्यांस त्यांनीं एकदम सांगितलें. तेव्हां मे. भाई साहेबाच्या जिवास किती समाधान झालें असेल व त्यांचें अंतःकरण किती प्रफुल्लित झालें असेल याची कल्पना आमचे सहृदय वाचणारेच करतील.

आमचे वकील मंडळीची शाबास ! ते धन्य आहेत. अशा ऐन प्रसंगाच्या वेळीं त्यांचें औदार्य कोणास कदाचित् अल्प जरी दिसलें तरी ते इतर प्रसंगापेक्षा या वेळीं पुष्कळपट मोलाचें आहे. "दुसऱ्याची मदत घेऊं नका. आह्मी फक्त वकील लोक ही विहीर पुरी करून देतों व लागेल तो पैसा लावतो. " हे त्यांचे उल्हासाचे, औदार्याचे, व वाणीचे शब्द केवळ बिनमोल आहेत, यांत संशय नाहीं. या त्यांच्या शब्दांनीं मे. भाईसाहेब यांस हर्षनिर्भर करून सोडिलें व त्यांनीं दुसरे दिवशीं ह्मणजे गेल्या शनिवारीं सकाळीं समारंभ करून सुमूहुर्तानें विहीर खणण्याची सुरुवात केली. एका घटकेपूर्वीं ज्या गोष्टीची कल्पना मनांत नव्हती ती गोष्ट मनांत आली व लागलीच फत्ते झाली. हें कृत्य मोठें सुयशाचे व परमेश्वरकृपेचें होय. असें ह्मणून हर्षनिर्भर होत्साते चांगल्या कृत्यास सर्वांनीं आरंभ करीत जावा त्यांत परमेश्वर यश देतोच असें सुचवून आह्मी आपला लेख पुरा करितो.

या विहिरीची जागा नदीपासून जवळ असल्यामुळें तिला विशेष खर्च न येतां सुमार ८०० रुपयांत काम आटोपेल असा अंदाजमास केला असल्यावरून वर्गणीची यादी झाली ती येणेंप्रमाणेः—

| | रुपये. |
|---|---|
| रा. रा. पांडुरंग गोविंद वकील | ७५ |
| ,, ,, देवराव विनायक वकील | ७५ |
| ,, ,, आबाजी खंडेराव | ७५ |
| ,, ,, गोपाळ खुशाल | ६५ |
| ,, ,, माधवराव विष्णु | ४० |
| ,, ,, मुकुंद बाळकृष्ण | ३५ |
| ,, ,, नरसो रामचंद्र | ३५ |
| ,, ,, सदाशिव नारायण मुंबईकर | ३५ |
| ,, ,, नथो लक्ष्मण | ३० |
| ,, ,, मार्तंड लक्ष्मण. | ३० |
| ,, ,, रावजी घनःशाम. | ३० |
| मे० मौलवी हाकीमुद्दीन. | ३० |
| रा रा. मोरो रावजी. | २५ |
| ,, ,, माधव अमृत. | २० |
| ,, ,, आबाजी मैराळ. | २० |

या यादीच्या वेळीं हजर नसलेल्या मंडळींचे अंक हिजवर अजून पडावयाचे आहेत.

---

## युरोपांत पराकाष्ठेची थंडी

यंदाच्या हिवाळ्यांत ग्रेटब्रिटन देशांतच काय, पण बहुतकरून सर्व युरोप खंडांत पराकाष्ठेची थंडी पडली. गेल्या डिसेंबरच्या १० व्या तारखेस फ्रान्स देशांत बर्सेस व ओर्लीस एथें उष्णमापकांतील पारा थिजण्याच्या मर्यादेच्या खालीं ५० अंश, ह्मणजे फारेनैटच्या उष्णमापकांतील शून्य मर्यादेच्या खालीं १८ अंश गेला होता. स्विसलैंडांत व दक्षिणजर्मनींतही फार थंडी पडली होती. तिकडील वर्तमानपत्रांवरून समजतें कीं रोज बहुत पुरुष, स्त्रिया व मुलें थंडीनें आंखडून मरत. वृद्ध मनुष्यें सांगतात कीं असा कडक हिवाळा गेल्या ५० वर्षांत झाला नव्हता. सदरील तारखेच्या सुमारास दोन तीन आठवडे जशी अतिशय थंडी पडली होती तशी सन १८२९।३० च्या हिवाळ्यांत पडली होती.

पूर्वीं कित्येक वेळां अशी असाधारण थंडी पडल्याचे लेख जुन्या ग्रंथांत आहेत. सन १७०० मध्यें इतकी थंडी पडली होती कीं, पारा शून्यमर्यादेच्या खालीं २३ अंश उतरला होता आणि भूमध्य समुद्राचें पाणी फ्रान्स देशाच्या दक्षिण किनाऱ्यालगत तीएक ठिकाणीं थिजून गेलें होतें. इंग्लंड व फ्रान्स यांच्या मधील खाडींतही तसेंच झालें होतें. त्या हिवाळ्यांत फ्रान्स देशांतील बहुतेक झाडें व मोठाले वृक्ष हिवानें मरून गेले आणि बुदलांत ठेवलेला द्राक्षरस ( वाईन ) ज

सून गडासारखा झाला होता सन १७८३ नंतर १६ अंश थंडी पडली होती. ती एकसारखी ६३ दिवस होती आणि पारिस एथें तीन नदी पुरे दोन महिने थिजलीं होतीं. नंतर १७८८ मध्यें वर्सेल्स एथें जमीनीवर १२ इंच बरफ जमलें होतें. १७९५ तही पारिस एथें इतकी जबर थंडी पडली होती कीं उष्णमापकांतील पारा शून्यमयांदेच्या खालीं २३ अंश उतरला होता. आणि ४२ दिवस पराकाष्टेचें हींव पडलें होतें. त्यावरून बंदरांत पाणी थिजून त्यांत डच सरकारचीं लढाऊ गलबतें अटकून राहिलीं होतीं, तीं फ्रेंच रिसाल्याच्या स्वारांनीं बरफावरून घोडें दामटीत जाऊन घेतलीं.

याप्रमाणें कित्येक वेळां इंग्लंडांतही पराकाष्ठेची थंडी पडल्याच्या हकीकती इतिहासांत आढळतात. एकदां तर इतकें हींव पडलें होतें कीं टेम्स नदीचें पाणी थिजून खडकाप्रमाणें झालें होतें. ह्मणून दुकानदार लोकांनीं तेथें पालें वगैरे उभीं करून बाजार भरविला होता आणि हजारो लोक गाड्यांत व घोड्यावर बसून नित्य सहल करायास तिकडे जात असत. ही जत्रा तेथें कित्येक दिवस होती पुढें हवेंत गरमी येऊन बरफ वितळून फुटूं लागलें तेव्हां त्या बाजारकरी लोकांची पळापळी झाली.

रूस देशांत थंडीचें माहेरघर त्यांत काथेराईन राणीच्या वेळेस एकदां अतिशय थंडी पडली होती तेव्हां त्या राणीनें बरफाचें एक मंदीर बांधविलें होतें. त्याच्या भिंती, तुळया, दांड, कौलें, चौकटी, कवाडे, तावदानें, आणि तिच्या आंतील खुरच्या, मेज, पलंग, जेवणाची वगैरे भांडीं हीं सर्व बरफाचींच केलेलीं होतीं. त्या मंदिराच्या पुढें बरफाच्या कांहीं तोफा करून बरफाच्याच गाड्यांवर ठेवल्या होत्या, त्या दारू भरून सोडल्या तेव्हां त्यांचे आवाज धातूच्या तोफांच्या बरोबरीसारखे झाले, तरी त्या तोफा फुटल्या नाहींत व त्यांचें बरफ वितळलें सुद्धां नाहीं यावरून तिकडे थंडीचा अंमल केवढा जबरदस्त असतो याचें अनुमान आमच्या वाचकांस करतां येईल.

ब्रा. द.

## वऱ्हाड.

कर्नल बेल साहेब जुडिशियल कमिशनर औरंगाबादेकडून शुक्रवारीं एथें आले व शनिवारीं सेशनाकरितां वाशिमास गेले.

अलीशान रेसिडेंट साहेबांची स्वारी इंदुरास गेली होती. पूर्वी तिकडे हे पोलिटीकल एजंट असल्यामुळें त्यांचा व होळकर सरकारचा फार ऋणानुबंध होता त्या अगत्यास्तव होळकर सरकारानीं त्यांचा फार आदर सत्कार करून एक टोलिजंग मेजवानी दिली. व त्यांच्या स्तावक पुष्कळ भाषण झालें.

उमरावतीच्या इंजिनियर आफिसेंचे अकौंटंट मि. गाडफ्री यांस इंदुरास नेमिलें असें समजतें. वाशिमचेही अकौंटट इंदुरास जातील असें ह्मणतात.

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार इजुकेशनल इन्स्पेक्टर वाशिमाकडे आहेत.

खामगावास गिरणीकडील तीन युरोपियन गृहस्थांनीं एका रांडेच्या संबंधांत दोन तीन घरीं कांहीं आगळीक केली. व पोलिसासीही दांडगाई केली त्या संबंधी डिपुटी कमिशनर साहेबांपुढें चौकशी होऊन प्रत्येकास पंचवीस पंचवीस रुपये दंड झाला असें समजतें.

रा. रा. नानाभाई धैर्यवान कालिदासपुणेंकर नाटक मंडळीचे मालक हे आणखी कांहीं मंडळी मिळवून आपल्या नाटकाचे २ भाग करून दोन ठिकाणां वेगवेगळ पाठविण्याचे विचारांत आहेत असें कळतें. व गेले शनिवारीं यांनीं नारायणरावांचे मृत्यूचा फार्स फार चांगला केला व मंडळीही बरीच जमली होती असें कळतें.

हवामान— यंदा थंडीचे मान अतिशय आहे हें सर्वत्र प्रसिद्ध आहेच. मधून मधून थंडी थोडी कमी असते त्याप्रमाणें कालपासून थंडीचें मान थोडें कमी आहे हवा स्वच्छ व निरोगी आहे. पिकापाण्याचा अहवाल बरा आहे तरी कपाशीचे पिकाला जसें भरण असावें तसें नाहीं जवारीचें पीक पदरांत पडलें, पुढें गहु, लाख, हरभरे यांची पिकें मोठ्या जोमानें उभीं आहेत.

रा. स. बजाबा रामचंद्र प्रधान एथील डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर काल दवऱ्यावरून एथें आले. व बुलढाण्याचे डि. इ. इन्स्पेक्टर रा. रा. वामनराव गणेश परांजपे हेही काल एथें आले आहेत.

एथील पोलिस चीफ कान्स्टेबल मि. एकराम हुसेन यांची बदली तेल्हाऱ्यास करून तेथील मि. नरसय्या पोलिस चीफ कान्स्टेबल यांस अकोल्यास नेमिलें. याबदलीचें कारण असें कळतें कीं, एथील चीफ कान्स्टेबल एकराम हुसेन यानीं गेले मोहोरमाचे दंग्याचे आपलें कर्तव्यकर्म योग्य रीतीनें बजाविलें नाहीं " ह्मणून दंगा करणारे मुसलमान लोकांस दंडाची शिक्षा देते वेळीं मे. डिपुटी कमिशनर साहेबांनीं प्रोसिडिंगांत लिहून ठेविलें होतें त्यावरून पोलिस अधिकाऱ्यांनीं त्याविषयीं विचार करून ही योग्य तजवीज केली हें पाहून आह्मास संतोष वाटतो.

मेजर फिटस् जरल्ड साहेब थर्ड क्लास डे. क. साहेब हे गेल्या आठवड्यांत मुंबईस रजेवरून परत आले व कालचें गाडींतून स्वारी येथें आली. व आज उद्या साहेब बहादुर येथलि डे. कमिशनरचे कामाचा चार्ज घेतील.

रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर जु. क. साहेबांचे डे. क्लार्क ह्यांनां इलिचपूरचे डे. क. चे क्लार्क ऑफ धी कोर्टाचें जागेवर आक्टिंग जाण्याचा हुकूम झाला. व ते आजरोजीं तिकडेस गेले. त्यांचे जागेवर मि. महंमद इस्माइलि ह्यांस नेमले असून त्यांणीं कालरोजीं मि. पिसोळकर ह्यांजपासून आपलें कामाचा चार्ज घेतला व गेले शुक्रवारीं जु. क. साहेबांबरोबर दवऱ्यावरही गेले. मि. महंमद इस्माईल ह्यांचे डे. क्लार्कचें जागेवर मि. शेखकासम ह्यांस नेमिलें असें कळतें

मे. ड्रेसडेल साहेब इकडील डेपुटी कान्सर्वेटर फॉरेस्ट ह्यांना येत्या १ ली फेब्रुवारी पासून १ वर्षाची विलायेत जाण्याकरितां रजा मिळाली. शिवाय १५ दिवसांची जाण्याचे तयारी करितां मिळाली आहे. त्यांचे जागेवर नॅर्थवेस्टर्न प्रांतांतील डे. कान्सर्वेटर मि. सी. वागशाई यांस नेमलें.

सरदार ह्या नावाच्या एका जुन्या गुन्हेगारानें पातूर हद्दींत एकाचीं कांहीं भांडीं चोरलीं त्याबद्दल त्याची मे. डे. क. साहेबांपुढें चौकशीं होऊन त्यास ३ वर्षांची सजा मिळाली.

ठ. अ.

रा. रा. हणमंत रामचंद्र तहशीलदार मेहेकर यांची प्रकृती चांगली सुधारली आहे व ते रजा संपल्या बरोबर आपले कामावर जातील असें कळतें.

जन्ममृत्यु— गेल्या आक्टोबर महिन्यांत वऱ्हाडांत एकंदर मुलें ११,७७ जन्मलीं आणि ५१७६ लोक मेले. या पैकीं तापानें ३८७३, पोटदुखीनें ९४२ व बाकीचे इतर रोगानें मेले.

इकडील कोर्टफीचे टिकिटांवर" बिरार" असा इंग्रजी अक्षरांचा शिक्का असतो. अशा शिक्या खेरीजच्या कांहीं टिकिटांचा कांहीं लोकांनीं उपयोग केला आहे असें येथील स्मालकाज कोर्टांत उघडकीस आलें आहे. हीं टिकिटें वेंडर लोकांकडेस विक्रीस कशीं आलीं या संबंधानें तपास चालूं आहे. प्र. सिं.

रावबहादूर नारायणभाई दांडेकर विद्याखात्याचे डायरेक्टर हे मोर्शीकडे आहेत असें कळतें.

## जाहिरात.

सर्व लोकांस खालीं सही करणार यांजकडून या जाहिरातीवरून जाहीर केलें जातें कीं रा. रा. गोविंद माधव देशपांडे रहाणार अकोलें यांस आह्मी आपले वतीनें सरकारी कामकाजा संबंधी मुक्त्यार नेमून आठ रुपयांचे स्टांप कागदावर कुलमुक्त्यारपत्र दिलें होतें तीं आमचीं कामें सर्व संपलीं व हल्लीं सदर्हू इसमाची आह्मास कांहीं जरूरी राहिली नाहीं सबब आज तारीखे पासून सदर्हू कुलमुक्त्यारपत्र आह्मी रद्द केलें आहे. या तारखेपुढें त्यांनीं कांहीं काम केलें असलें व करतील तें सर्व बातल असे. सर्वांस कळावें तारीख ३० माहे जानेवारी सन १८८० इसवी.

( सही ) लक्ष्मीबाई जवजे माधवगीरजी<br>
कुलमुक्त्यार गोविंदगीर गुरू<br>
मयागीर दस्तुर खुद.

मागाहून आलेल्या नोटीसा.

नोटिस.

रा रा. गोविंद माधव देशपांडे मुक्काम अकोलें यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं आह्मी आपले दुकानचे कामकाजासंबंधीं फिर्यादीचे मुकदम्यांत आठ रुपयांचे कागदावर मुक्त्यारपत्र दिंलें होतें तें सर्व काम खलास झालें सबब दोन महिन्यापूर्वी तुह्मास कळवून तें मुक्त्यारपत्र रद्द केलेंच आहे. हल्लीं तुह्मास ही नोटिस देण्याचें कारण तुह्माकडे या आमच्या कामासंबंधीं हरएक कागदपत्र, तसेच बारिष्टर व सालिसिटर यांस पैसे दिल्याच्या पावत्या व गोविंदगीर गुरू मयागीर बावा याचे कागदपत्र व सदरील रद्द केलेलें मुक्त्यारपत्र एकूण सर्व कागद ही नोटिस पोचल्यापासून आठ दिवसांत आमचे स्वाधीन करून पावती घ्यावी. याप्रमाणें मुदतशीर न कराल तर कायदेशीर रीतीनें सर्व कागदपत्र तुह्मापासून घेण्यांत येतील. कळावें तारीख ३० माहे जानेवारी सन १८८० इसवी.

( सही ) लक्ष्मीबाई जवजे माधवगीरजी<br>
कुलमुक्त्यार गोविंदगीर गुरू<br>
मयागीर दस्तुर खुद.

नोटिस.

नथु सुंदरजी गुजराथी राहणार मुंबई कोट घर नंबर ८ यांस खालीं सहीकरणार याजकडून या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं, आमचे खातेबाकी रुपये १६०३८१५ सोळाशें तीन रुपये पंधरा आणे, मारवाडी मित्ती माघ वद्य २ संमत १९३६ गुजराथी मित्ती पोष्य वद्य २ संमत १९३६ रोजीं तुमचेकडेस घेणें निघालें ते सदरील रुपये या नोटिशीचे तारखे पासून ८ दिवसांचे आंत मुंबईंत आमची जी श्रीराम मोता ह्या नावाची दुकान आहे त्या दुकानावर भरून रसीद आमचे कडेस पाठवावी. नाहीं तर आह्मी तुमचेवर कायद्याप्रमाणें फिर्याद करून या नोटिसीचे व फिर्यादीचे खर्चासुद्धां पैसा भरून घेऊ. कळावें, तारीख ३१ माहे जानेवारी सन १८८० इसवी.

( सही ) जैसिंगदास हंसराज साहु<br>
दुकान खामगाव मुखत्या<br>
र पत्रावरून गोविंद पं-<br>
ढरीनाथ द. खुद्द.

नोटिस.

पुरुषोत्तम नरोत्तमदास गुजराथी राहणार मुंबई चौकी बाजार घरनंबर १०२ यास खालीं सही करणार याकडून या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, आमचे खातेबाकी ऐन रुपये ६१९।–॥। मारवाडी मिती चैत्र बद्य २ संमत १९३५ रोजीं निघाले याजबद्दल प्रथमच हिशेब तुमचे कडेस पाठविला आहे आणि व्याजाबद्दल रुपये ३३ मारवाडी मिती माघ वद्य २ संमत १९३६ रोजीं निघाले ते एकुण रुपये ६५२।–॥। सहाशें बावन रुपये पावणेसाहा आणे तुमचे कडेस घेणें निघाले ते सदरील रुपये या नोटिशीचे तारखेपासून आठ दिवसांचे आंत मुंबईंत आमची जी श्रीराम मोता ह्या नावाची दुकान आहे त्या दुकानावर भरून आमचेकडेस पावती पाठवावी. नाहींतर आह्मीं तुमचेवर कायद्याप्रमाणें फिर्याद करून या नोटिशीचे व फिर्यादीचे खर्चासुद्धां पैसा भरून घेऊं. कळावें, तारीख ३१ माहे जानेवारी सन १८८० इसवी.

( सही ) जैसिंगदास हंसराज साहु दुकान खामगाव मुखत्यारपत्रावरून दस्तूर गोविंद पंढरीनाथ.

## वर्तमानसार.

मुंबईतील विक्टोरिया गार्डनमध्यें नुकताच एक काठेवाडी तीन वर्षांचा सिंह आणला आहे. पुष्कळ लोक त्यास पहावयास जातात.

मुंबई वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा समारंभ गेल्या गुरुवारीं व शुक्रवारीं झाला. उमेदवार १३ यावयाचे असून फक्त १० चींच भाषणें झालीं. एकंदर तीन उमेदवारांस इनाम देण्याचा ठराव होऊन पहिले ४० रुपयांचें कृष्णाजी दामोदर शास्त्री भोंडे यांस, दुसरें २५ रु० चें बळवंत खंडुजी पारख यांस व तिसरें २० रुपयांचें अण्णा मार्तंड जोशीं यांस याप्रमाणें इनामें देण्यांत आलीं.

मुंबई इलाख्याची बरीच फौज काबुलाकडे रवाना होत आहे. कितीएक पायदळ व स्वारांच्या पलटणीस जाण्यास तयार असावें ह्मणून हुकूम झाले आहेत.

ब्राह्मसमाजाचा पन्नासावा वार्षिक उत्सव हल्लीं कलकत्ता एथें चालला आहे,

रंपा प्रदेशांतील बंडावा अद्यापि चालू असून थोड्या दिवसापूर्वी कन्नापराती या गावांतील लोकांवर हल्ला करून कांहीं लोकांस धरून घेऊन गेले असें समजतें.

यंदाच्या सरकारी वर्षाच्या आठ महिन्यांत मिठाबद्दल ४,३७,३२,२२५ रु. उत्पन्न झाले असें समजतें. सु. प.

पांच वर्षेपर्यंत दरसाल १९ हजार रुपये जव्हार सरकारास देऊन तेथील अपकारी खातें आमच्या सरकारानें आपल्या वहिवाटींत घेतलें व त्याच तजविजी करितां हल्लीं जव्हारचे राजे मुंबई एथें आले आहेत.

रशियन सरकारानें काश्मीर प्रदेशांत कांहीं खटपट सुरू केली अशी कंडीं पायोनियर वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली आहे.

मुंबई इलाख्याचे स्यानिटरी कमिशनर याणीं सन १८७८ इसवी सालाबद्दल आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे. या रिपोर्टांत अशी एक चमत्कारिक गोष्ट नमुद झाली आहे कीं सन १८७८ इसवी सालांतील जननाची संख्या सन १८७७ इसवी सालांतील संख्येपेक्षां ६८४०८ नीं कमी आहे, व सन १८७३ तागाईत ७८ पर्यंत ६ वर्षांचे जननाचें सरासरीनें जें प्रमाण निघतें त्याप्रमाणापेक्षां सन १८७८ इसवी सालांतील जननाची संख्या ८०९६७ नीं कमी आहे. ह्या संबंधानें मुंबई सरकारचा असा अभिप्राय आहे कीं दुष्काळामुळें ही गोष्ट घडून आली असावी.

रंपा एथील बंडखोर लोकांपैकीं बोडालूर अम्मलेरडी नावाच्या इसमास पकडण्याबद्दल सरकारांतून ५०० चें इनाम लागलें असून त्याचे छपण्याचे ठिकाणीं रात्रीचा छापा घालून त्यास मि. स्वीट एक पोलिस आफिसर याणीं पकडला. कैदीनें पकडण्याचे वेळेस फारसी दांडगाई केली नाहीं. ज्ञा. प्र.

सर रिचर्ड टेंपल साहेब यांची स्वारी पुन्हा काबुलास सर राबर्ट सांडमन जे वैसराय यांजशीं एकांत करून आले आहेत त्यांजबरोबर जाण्याकरितां तारीख २७ रोजीं मुंबई येथून निघणार होती.

मुंबईस ग्रे. इं. पे. रे. कंपनीचें शेवटचें स्टेशन बांधण्याच्या कामास २५ लक्ष रुपये खर्च होतील व यासारखें युरोपाबाहेर एवढें मोठें स्टेशन कोठेंही नाहीं असें हें होणार आहे असें ह्मणतात.

विडी पिण्यापासून भयंकर परिणाम— तारीख २१ रोजीं सकाळीं एक वाजतां मुंबईस नळबाजारांतील वाण्याचे दुकानास आग लागून चार दुकानें जळून खाक झालीं. माल व इमारत मिळून दोन लक्षावर नुकसान झाल्याचें समजतें. मनुष्य मात्र दगावलें नाहीं. आग लागण्यास कारण पेटविलेली विडी झाली अशी बोलवा आहे.

दरवडे खोरांचा निकाल— कळंबी एथील प्रसिद्धीस आलेले तात्या मकाजी वगैरे यांणीं बरेच दिवस धुंडाई माजवून लोकांस व सरकारास फार त्रास दिला होता. परंतु ते तारीख १० मिनहू रोजीं सातारचें पोलिसापैकीं संतराम जमादार यांणी कित्येक शिपायांचे साह्यानें उपाळे गावचे हद्दींत त्याचे साथीदारांसह पकडले त्या वेळेस तात्यास गोळी घालण्यास पोलिसास विशेष कारण पडलें, ती गोळी तात्याचे दंडांत शिरून छातीस चाटून गेली याजमुळें तो आजारी पडला होता व अखेर पुसेसावळीचे इस्पितळांत मरण पावला. बाकीचे पकडलेले दरवडेखोर वगैरे पोलिसानें मोठ्या थाटानें सातारा एथें नेले आहेत एकंदरीनें आतां दरवड्याचे पुढारी वगैरे मोहोरपे सांपडल्या मुळें लोक त्रासांतुन मुक्त झाले, आणि पोलिसाची धावाधावही कमी झाली अथवा होईल याजबद्दल आनंद वाटतो. सदहू दरोडेखोर सातार्‍यांत आणले तेव्हांचा देखावा फार थाटाचा असल्यामुळें पहाणार्‍या लोकांची अतिशय गर्दी झाली होती.

सेंटपिटर्सबर्गचे तारीख १७ चे तारेवरून समजतें कीं, रशिया देशचे सरकार आपले राज्यांत म्युनिसिपल कमिट्या स्थापन करण्याच्या बाबदींत विचार करीत आहे. किती आमचें पाऊल पुढें पडलें आहे तें पाहावें.

विशाल वृक्ष— सातारा जिल्ह्यांत वाई तालुक्यांत ह्मसव्याचा वड प्रसिद्ध पाहण्यासारखा आहे त्या वडाखालील जमीन सर्वे नंबर ४५ क्षेत्रफळ ३ एकर १४ गुंठे आहे. याला कोणी कोणी जानुबाईचा डोंगर ह्मणतात. ह्या वडाची लागण शके ६९ सर्वजित नामें संवत्सरे ह्मणजे सन १४७ मध्यें झाल्याबद्दल चांगल्या आधारावरून कळतें. वरील शक आणि सन हे पाहू गेल्यास ह्या वडास आज १७३२ वर्षे झालीं. व याच्याच पश्चिम बाजूवर दुसरा काळूबाईचा वड एक एकर छत्तीस गुंठे असा आहे. या दोन्ही वडाचे खालील छायेंत निदान १,००० घोडा बांधतां येईल. हा वड पुणें आणि सातारा या रस्त्यापासून दीड कोसावर आहे.

रशियन लोक जर्मनीच्या सरहद्दीवर फौजा जमा करीत आहेत हें वर्तमान निराधार आहे इतकेंच नव्हें. पण स्वस्थतेच्या वेळेस जेवढी फौज असावयाची तिजपेक्षां रशियाची फौज हल्लीं कमी असून ते फौज कमी करीत आहेत असें सेंटपिटर्सबर्ग एथील तारेवरून कळतें.

अयोध्या प्रांतांतील बल्रामपुरचे महाराज यांणीं आपली फौज, घोडे, हत्ती वगैरे सामान व एक लक्ष रुपये काबुलच्या लढाईंत हिंदुस्थान सरकारच्या मदतीसाठीं देण्यास तयार आहों असें पुन्हा सरकारास कळविलें आहे. ने ओ.

## मन.

मनुष्य प्राण्यास ईश्वरकृपेनें ज्या कांहीं उत्तम देणग्या प्राप्त झाल्या आहेत त्यांपैकींच मन ही एक होय. हें मनेंद्रिय जीं पांच ज्ञानेंद्रियें त्यांतील पहिलें ह्मटल्यास चालेल. कारण ज्ञानप्राप्ति हें जें मनुष्याचें मुख्य कर्तव्य तें साध्य होण्यास मनुष्यास प्रथम मनाची मदत लागते. ह्मणजे नेत्र, कर्ण, हस्तपादादि कर्मेंद्रियांच्या योगानें या सृष्टींतील अनंत रचनेविषयींचा जो संस्कार तो प्रथम मनावर होतो. मग तेथून अन्य जीं ज्ञानेंद्रियें तीं क्रमाक्रमानें आपापलें कार्यभाग उचलितात. नेत्रांनीं वस्तु पाहिली कीं तिजविषयीं विचार उत्पन्न होतो तो मनांत. मग विचारशक्तीस स्फुरण होऊन ती वस्तु कशी झाली आहे, कशासाठीं झाली आहे, कोणी केली आहे वगैरे कल्पना उत्पन्न होतात. तेव्हां ज्ञानेंद्रियांतील पहिलें जें मन तें कसें असलें पाहिजे व त्याला शिक्षण कसें असलें पाहिजे याचा विचार करणें हेंच आपलें कर्तव्य होय.

आजपावेतों आपल्या देशांत जे कोणी साधु संत व विचारी पुरुष होऊन गेले त्यांनीं या मनाच्या शिक्षणाविषयीं अतिशय परिश्रम केले आहेत, असें रामदासांच्या मनावरील श्लोकांवरून वगैरे आढळतें. मोरोपंतांनीं एके ठिकाणीं ह्मटले आहे:—

मन हें ओढाळ गुरूं
परधन परकामिनीकडे धांवे ॥
यास्तव विवेकपाशें कंठीं
वैराग्यकाष्ठ बांधावें ॥ १ ॥

वरील आर्येत मन हें एक ओढाळ गुरूं आहे असें ह्मटलें आहे तें खोटें आहे काय! ओढाळ गुरूं जसें नजर चुकावून, चोरून दुसऱ्या शेतांत शिरण्यास सवकलेलें असतें तद्वत् मन हेंही जें कांहीं आपलें नव्हे त्याचा अभिलाष करण्याविषयीं विवेकाची नजर चुकवून प्रयत्न करीत असतें. ओढाळ गुराच्या गळ्यांत जसें लोढणें बांधून, त्याची दुसऱ्याच्या शेतांत शिरण्याची सवय मोडून टाकावी लागते त्याप्रमाणेंच मनाला मार्गावर ठेवण्यास त्याच्या गळ्यांत विवेकरूप दोरीनें वैराग्याचें लोढणें बांधावें लागतें. तसें न करितां मनाला जर मोकळें सोडलें तर त्या ओढाळ गुरास जसा नित्य मार खावा लागतो व शेवटीं कोंडवाड्यांत उपाशी मरत पडावें लागतें तसा मार खाऊन उपाशीं मरण्याची पाळी येईल. ह्मणून ज्यांचीं मनें अजून शिक्षण घेण्यासारखी असतील व जे तरुण असून ज्यांचीं मनें तारुण्याच्या धुंदीनें भ्रष्ट होण्याच्या मार्गांत असतील त्यांनीं वेळेवर सावध होऊन आपलीं मनें सुशिक्षित करण्याची सत्वर योजना करावी ह्मणजे कल्याण आहे. सु. प.

---

## जाहिरात.

ग्रंथोत्तेजक मंडळीचे व्यवस्थापक यांजकडून देण्यांत येते कीं खालीं लिहिलेलीं पुस्तकें मंडळीनें आपल्या वर्गणीदारांस देण्याकरितां पसंत केलीं आहेत. तीं सर्व किंवा त्यांपैकीं जीं कांहीं ज्यांस पाहिजे असतील तीं त्यांणीं खालीं सही करणारांकडे कळविलें ह्मणजे पाठविण्यांत येतील.

१ हिंदुस्थानचा इतिहास (लोकहितवादीकृत) याचे प्रस्तावनेंत मुसलमानीं धर्माचें चरित्र घातलें आहे. पृष्ठें सुमारें ४०० किंमत २ रु.

२ स्वाध्याय. ( ,, ,, ) पृ. सु. ३५० किंमत २ रु.

३ सार्थआश्वलायनसूत्र ( ,, ,, ) पृ. सु. २०० किं. १ रु. ४ आ.

४ ऐतिहासिक गोष्टी भाग ३ ( ,, ,,) किंमत १ रु.

५ कृषिकर्मांतर्गत रसायनशास्त्र व भूगर्भशास्त्र ( बाळकृष्ण आत्माराम गुप्ते कृत. ) पृष्ठें सुमारें ३००. किंमत २ रु.

६ शिवाजी चरित्र. ( गणेशशास्त्री लेले कृत ) किं. १ रु.

७ स्वपराक्रम. ( गणेश भिकाजी गुंजीकर कृत. ) किं. १ रु.

ज्या वर्गणीदारांकडून एकाही वर्षाची वर्गणी मंडळीकडे आली नाहीं त्यांनीं चालू सालच्या प्रारंभापर्यंत दोन वर्षांची वर्गणी १० रुपये व चालू सालची ५ रुपये एकूण १५ रुपये आणि पहिल्या वर्षाची वर्गणी भरलेल्या वर्गणीदारांनीं रुपये १० असे त्वरित पाठवून देण्याची मेहरबानी करावी.

मंडळीची व्यवस्था नीट लागावी ह्मणून गेल्या डिसेंबर महिन्यांत पुण्यास मंडळीच्या सभासदांची सभा भरून जी व्यवस्था झाली तिची सर्व हकीकत लौकरच प्रसिद्ध करण्यांत येईल. झालेल्या हकीकतीवरून मंडळीच्या उद्देशाप्रमाणें सर्व व्यवस्था नीट व सुयंत्र चालेल अशी आशा आहे. कळावें. ता० २४ जानेवारी सन १८८०

मंडळीच्या आज्ञेवरून.
गोपाळराव हरी देशमुख

मुंबई, माधव बागेसमोर
डा० मोरेश्वर गोपाळ
देशमुखांचे घरी.

## कौमुदीमहोत्साहः.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकांत, ध्यें " सिद्धांत कौमुदी " संस्कृत व्याकरण आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षड्लिंग. अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तीपूर्वभाग इतकें संपूर्ण झालें, पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शब्दांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा, पण वर्षाची वर्गणी अगाऊ चार रुपये पाठविल्यास टपालखर्च माहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मांस " पोष्टपेड " पत्रीं कळवावें ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

रामचंद्र भिकाजी गुंजीकर
कौमुदीमहोत्साहकर्ते.
मुंबई काकडवाडी घर नंबर ८

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख १६ माहे फेब्रुवारी सन १८८० इसवी. अंक ७


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| [illegible]चे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## मुंबई ब्यांक.

अमानत ठेविलेल्या पैशावर व्याजाचे दर.

१२ महिने ठेविल्यास दरसाल दर शेकडा ४ रुपये.

६ महिने ठेविल्यास (ह्मणजे तारीख १ नोवेंबर पासून ता० ३० जूनपावेतों एकसारखें कोणतेही सहा महिनेपर्यंत दरसाल दर शेकडा ३ रुपये प्रमाणें.

सदहू प्रमाणें न ठेविल्यास दरसाल दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज मिळेल

तात्पुरची किंवा मुद्दाम व्यवस्था केल्याशिवाय कमी मुदतीपर्यंत अथवा अधिक व्याजानें अमानत पैसा ठेविला जाणार नाहीं.

चालू अमानत पैशाच्या खाह्यावर व्याज दिलें जाणार नाहीं.

मुंबई.

तारीख १ आगष्ट सन १८७९ इसवी.

## नोटिस.

उमरावतीचा सेंट्रल जेल ( तुरुंग ) व ल्युनाटिक असाइलम ( वेड्याचें इास्पितळ ) यांकरितां मार्च महिन्याचे पहिले तारखेपासून १२ महिने पावेतों सामान पुरविण्याच्या मक्त्याचीं टेंडरें पाहिजे आहेत. सामानाचा नेम खालीं लिहिल्याप्रमाणें:—

नित्य लागणारे सामानाचा अजमास.

| नं. | पदार्थ. | जेल यत्ता मण | जेल यत्ता शेर | जेल यत्ता छ. | असाइलम यत्ता शेर | असाइलम यत्ता छ. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दुसरे प्रतीचे गहू आठवड्यांतून तीनदा | ८ | २० | | | |
| | दुसरे प्रतीची कणीक नित्य | | | | २० | |
| २ | जोंधळे पहिले प्रतीचे आठवड्यांतून चारदा | ९ | | | | |
| ३ | दाळ दररोज | २ | | | | |
| ४ | तूप | | ४ | | | |
| ५ | मीठ | | ८ | | | |
| ६ | मिरच्या | | २ | | | |
| ७ | सरपण | ५ | | | | |
| ८ | तैलबीज ( गावराणी) अथवा जवस दररोज. | १ | ३५ | | | |
| | तिळाचें तेल | | | | | ८ |
| ९ | लसूण | | २ | | | |
| १० | हळद | | | १४ | | |
| ११ | धने | | १ | | | |
| १२ | चिंच | | | | | ४ |
| १३ | मांस | | | | १० | |
| १४ | भाज्या | | | | १० | |
| १५ | फुटाणे | | | | ६ | |

सदहू कंट्राक्ट ज्यांस घ्यावयाचें असेल त्यानीं आपल्या टेंडरा सोबत १०० रुपये डिपाझिट पाठवावे. ज्याचें टेंडर मंजूर होईल त्याची ती रकम नेमल्या वेळीं सामान पोंचण्यासाठीं सिक्युरिटी ह्मणून ठेविली जाईल. व ज्यांचीं टेंडरें नामंजूर होतील त्यांची ती रकम लागलीच परत केली जाईल.

वर लिहिलेल्या शर्ती बरहुकूम टेंडरें पाठविणारांनीं टेंडराबरोबर प्रत्येक जिन्नस अर्धशेराहून कमी नाहीं इतका मोहरबंद पाठविला पाहिजे. टेंडरें मोहरबंद असावीं त्यावर "जेल ऱ्याशन पुरविण्याकरितां टेंडर" असें स्पष्ट लिहून खालीं सही करणाराकडे रजिष्टर पत्रांतून पाठवावीं अथवा जेल आफिसमध्यें स्वतां येऊन द्यावीं. त्याबद्दल पावती मिळेल.

या महिन्याचे २० वे तारखेस टेंडरांच्या मोहरा तोडून तीं पाहिलीं जातील, सबब त्या दिवसाचे ५॥ वाजल्यानंतर कोणाचें टेंडर कसलीही सबब असली तरी घेतलें जाणार नाहीं. सर्वांत हलके दराचें अथवा अमुक एक टेंडर कबूल केलें जाईल अशाविषयीं खालीं सही करणार आपणास बांधून घेत नाहींत.

कायम ठरलेल्या कंट्राक्टरानें एक बांड लिहून दिला पाहिजे त्याचा मसुदा जेल आफिसमध्यें कोणत्याही दिवशीं १२ वाजल्यापासून ४ वाजतपर्यंत दाखविला जाईल.

(सही ) जी. ई. किंग.
सुपिरिंटेंडेंट सेंट्रल जेल अमरावती.

## जाहिरात.

ग्रंथोत्तेजक मंडळीचे व्यवस्थापक यांजकडून देण्यांत येतें कीं खालीं लिहिलेलीं पुस्तकें मंडळीनें आपल्या वर्गणीदारांस देण्याकरितां पसंत केलीं आहेत. तीं सर्व किंवा त्यांपैकीं जीं कांहीं ज्यांस पाहिजे असतील तीं त्यांणीं खालीं सही करणारांकडे कळविलें ह्मणजे पाठविण्यांत येतील.

१ हिंदुस्थानचा इतिहास (लोकहितवादीकृत) याचे प्रस्तावनेंत मुसलमानीं धर्मांचें चरित्र घातलें आहे. पृष्ठें सुमारें ४०० किंमत २ रु.

२ स्वाध्याय. ( ,, ,, ) पृ. सु. ३५० किंमत २ रु.

३ सार्थआश्वलायनसूत्र ( ,, ,, ) पृ. सु. २०० किं. १ रु. ४ आ.

४ ऐतिहासिक गोष्टी भाग ३ ( ,, ,,) किंमत १ रु.

५ कृषिकर्मांतर्गत रसायनशास्त्र व भूगर्भशास्त्र ( बाळकृष्ण आत्माराम गुप्ते कृत. ) पृष्ठें सुमारें ३००. किंमत २ रु.

६ शिवाजी चरित्र. ( गणेशशास्त्री लेले कृत ) किं. १ रु.

७ स्वपराक्रम. ( गणेश भिकाजी गुंजीकर कृत. ) किं. १ रु.

ज्या वर्गणीदारांकडून एकाही वर्षाची वर्गणी मंडळीकडे आली नाहीं त्यांनीं चालू सालच्या प्रारंभापर्यंत दोन वर्षांची वर्गणी १० रुपये व चालू सालची ५ रुपये एकूण १५ रुपये आणि पहिल्या वर्षाची वर्गणी भरलेल्या वर्गणीदारांनीं रुपये १० असे त्वरित पाठवून देण्याची मेहेरबानी करावी.

मंडळीची व्यवस्था नीट लागावी ह्मणून गेल्या डिसेंबर महिन्यांत पुण्यास मंडळीच्या सभासदांची सभा भरून जी व्यवस्था झाली तिची सर्व हकीकत लौकरच प्रसिद्ध करण्यांत येईल. झालेल्या हकीकतीवरून मंडळीच्या उद्देशाप्रमाणें सर्व व्यवस्था नीट व सुयंत्र चालेल अशी आशा आहे. कळावें. ता० २४ जानेवारीं सन १८८०

मंडळीच्या आज्ञेवरून.
गोपाळराव हरी देशमुख

मुंबई, माधव बागेसमोर
डा० मोरेश्वर गोपाळ
देशमुखांचे घरी.

विक्रीस तयार.

## हिशेबरत्नमाला किंवा कुट्टक गणित.

नवीन प्रकारचें पुस्तक.

हें पुस्तक सुंदर टाइपानें छापून विक्रीस तयार झालें आहे. याची किंमत १३ आणे असून याचीं पृष्ठें सर्व १८२ चतुष्पत्री मोठ्या साचाचीं आहेत. यांत पांच भाग आहेत. बाहेर गावीं मागणारांस टपाल खर्च शिवाय एक आणा पडेल. १० प्रति मागणारांस एक प्रत कमिशन मिळेल. या पुस्तकाची किंमत सर्वांच्या सोयीसाठीं फार थोडी ठेविली आहे हें पुस्तक पाहिल्यानें ध्यानीं येईल. प्रत्येक मास्तरांनीं हें पुस्तक संग्रहीं ठेवण्यास फार योग्य आहे.

नाटपेड पत्र पाठवूं नये. पैसा टिकिटें असल्यास वर्ताळ्यासुद्धां पाठवावीं पोस्टांतून पैसा पाठविण्याची सोय उत्तम झाली आहे.

सदहू पुस्तकें खालील पत्यावर आह्मांकडे अथवा वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मिळतील. कळावें ता० २४ जानेवारी १८८० इसवी.

नारो रघुनाथ मोहोळकर
मास्तर, ट्रेनिंग कालेज अकोलें.
वऱ्हाड प्रांत.

## नोटिस

मे. इस्मायलखा वल्लद महमदखा भुसारी रहाणार पेठ बाळापुर यास महेराबखा वल्लद दलेलखा पाटील मौजे मांडोली तर्फ पारस तालुके बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येतें अशीजे, पहिलें तुह्मास आमची कन्या दिल्याचे योगानें तुमचा आमचा परकीय विचार नव्हता. सबब तुह्मापाशीं आह्मी आपले डागिने व सामान ठेविला तो खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१ पायाजिबा जोड १ चांदीचा ४० तोळ्याचा. बुगड्या जोड १ वजन एक तोळा सोन्याच्या. तांदळीपोत व चवकड्या सोन्याच्या. पवची जोड चांदीचे १० तोळे वजनाचे. सोन्याच्या लगड्या वजन तोळे ८ च्या. रोख कलदार रुपये २६५.

येणें प्रमाणें ऐवज तुह्मापाशी ठेविला तो ऐवज तसाच अमानत राहून तुह्मी आह्मास एक खंडी जवारी दरसाल देत जावी असा नियम ठरला होता. त्याप्रमाणें एक साल एक खंडी जवारी दिली. दुसरे सालीं जवारीचा भाव ६० रुपये झाला सबब तुह्मी दहा मण दिली तीच आह्मी कबूल केली. पुढें एके दिवशीं आह्मावर असा प्रसंग आला कीं, आमचे भाई बिरादर यांनीं इनामा बद्दल आह्मावर फिर्यादें करण्याचा इरादा केला त्यावरून आह्मी तुह्मास सला विचारली तेव्हां तुह्मी सला दिली कीं, तुमचे इनाम आह्मापाशी १५० रुपये पर्यंत गहाण ठेवून नोंदून द्यावें, तुमचा आमचा दुसरेपणाचा विचार नाहीं. ह्मणून आह्मी विश्वासानें सन १८७२ सालांत दोडशें रुपयांचा दस्तैवज करून दिला. तो दस्तैवज अमानत आहे. त्या दस्तैवजा बद्दल रुपये आह्मी तुह्माजवळून मुळींच घेतले नाहींत सबब तो दस्तैवज पोल ह्मणजे निरर्थक आहे.

आमची कन्या तुह्मास दिली होती ती मरून पांच वर्षे झालीं तिचे मरणानंतर एक वर्षानें ह्मणजे सुमार च्यारवर्षांपूर्वीं सदहू तुह्माजवळ आमचा असलेला पोल दस्तैवज परत घेण्याकरितां पंचाईत झाली तेव्हां हजरत मवल्वी साहेब, शेट हेमचंद गुजराथी. पानाचंद, काजीसाहेब, रा. रा. शामराव देशपांडे व शिवाय सर्व गाव होता ते सर्व साक्षी आहेत. तुह्मी हट्टानें तो दस्तैवज परत दिला नाहीं. हल्लीं तोच दस्तैवज तुह्मी शेट पोपटलाल यांस तुह्मी तीनशें रुपयांस विकला ह्मणून ऐकतो. तर खुशी तुमची परंतु आह्मी तुमचेच देवाल झालो नाहीं मग साहूस देणार कोठून आह्मी कोणाचेच देवाल नाहीं कारण तो दस्तैवज पोल आहे.

येणेंप्रमाणें मजकूर आहे. करितां ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत आह्मी तुह्माजवळ अमानत ठेविलेले चांदी सोन्याचे डागिने, रोख रुपये व पोल दस्तैवज हीं सर्व परत द्यावीं. वरील मुदतींत सर्व न दिल्यास शिरस्त्याप्रमाणें तजवीज करावी लागेल या नोटिशीचा व कोर्टाचा खर्चसुद्धां तुह्मापासून भरून घेऊ. कळावें. तारीख २९ जानेवारी सन १८८०

(सही) मेहेराबखा वल्लद दलेलखा पाटील मौजे मांडाली ता. बाळापुर.

नोटिस.

चिनाआपा वल्लद नारायण आपा राहणार आमसेत प्रगणें लाडखेड तालुके दारव्हे जिल्हे वणी यास देउ मर्द चिनाआपा हल्लीं राहणार हादगाव प्रगणें कुऱ्हाड तालुके यवतमाळ इजकडून देण्यांत येते कीं, मी वयांत आल्यास आज ४ वर्षे होत आलीं प्रथमतां मी तुह्माकडेस येऊन जनरीतीप्रमाणें राहिले पण तुह्मी पुरुषत्वांत नाहींत अशी माझी खात्री झाली असून लोकोपवादही तुह्माकरितां तसाच आहे असें असूनही मी तुमचे व माझे अब्रूचें संरक्षण करावें असें समजून एक वर्षपर्यंत तचीच राहिले पुढें तुह्मी मजकडून व्यभिचार करविण्यास प्रवृत्त झाला त्यास तुमचे मनाप्रमाणें मी वागलें नाहीं त्याजवरून तुह्मी मजबरोबर तंटा करून मजला घरांतून घालवून दिलें. आज तीन वर्षे होत आलीं मी आपले भावाचे गावीं (हातगाय) एथें राहिलें व लोकांचें कर्ज करून पोटास खाल्लें व वस्त्र प्रावर्णही घेतलें ह्याकरितां दरसाल रुपये १०० प्रमाणें तीनशें ३०० रुपये मजला कर्ज झालें आहे या सर्व कारणावरून तुह्मांस कळवितें कीं, सदरी झालेले कर्ज ही नोटिस पोचल्या पासून आठ दिवसांचे आंत मजला देऊन मजला तुह्मी आपले घरीं घेऊन जावें आणि घरीं नेल्यावर पूर्वी प्रमाणें वागविणार नाहीं अशा चार पंचलोकांसमक्ष माझी खात्री करावी याकरितां ही तुह्मास पंधरा दिवसांची मुदत दिली आहे ह्या दोन्ही मुदतींत ह्या दोन्ही गोष्टी तुह्मी न केल्यास तुमचा मजबर दंपत्य संबंधाचा हक्क बिलकूल राहणार नाहीं व मी आपले जातीधर्माप्रमाणें गंधर्व विवाह करीन कळावें तारीख २ माहे फेब्रुवारी सन १८८० इसवी.

(सही देऊ मर्द चिनाआपा इची हातची निशाणी बांगडी.

नोटिस.

निंबाजी वल्लद खंडुजी ढंगे वस्ती मौजे चिंचोली तालुके खामगाव यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुमचा बाप खंडु व कान्हु व मी असें त्रिवर्ग सखे बंधु असोन आपली चिंचोली एथील वतनदारीची जागा व जमीन ही आजपर्यंत समाईक राहून एक विचारानें होती. हल्लीं तुमचे वडील खंडुजी हे सुमारें तीन वर्षे झालीं मयत झाले असून त्याचे मागेंही दोन वर्षे एक विचारानें आपण चालविले हल्लीं तुमचे बनत नाहीं करितां तुह्मास पुष्कळ वेळा सांगत गेलों कीं, आतां जमीन व घरें समाईक न ठेविता हिस्से करावे त्याप्रमाणें तुह्मीही आह्मास सांगत गेले कीं हिस्से करितो, परंतु आजपर्यंत केले नाहींत. करितां तुह्मास व आह्मास खर्च न पडावा या साठी तुह्मास या नोटिशीनें असें कळविण्यांत येतें कीं नोटिस पावल्या पासून पंधरा दिवसांचे आंत पंच मार्फत सदर्हू जमीनीचे व घराचे हिस्से करावे त्याप्रमाणें तुह्मी न केल्यास शिरस्तेप्रमाणें तुह्मावर फिर्याद करून सदर्हू जमीन, घरें, व शेतें आपले ताब्यांत घेऊं व खर्च ही भरून घेऊ व त्याचप्रमाणें या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख १२ माहे फेब्रुवरि सन १८८० इसवी.

(सही) नारायण वल्लद राघो ढगे वस्ती चिंचोली हल्लीं वस्ती पारवी तालुके भुसावळ निशाणी खुदहातची.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मताम मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यास :—

वि. वि. पुढील मजकूर आपल्या पत्रीं छापण्याची मेहेरबानी व्हावी.

अकोट येथलि ई म. शाळेतील मुलांस वार्षिक परीक्षे बदल बक्षिसें वांटण्याचा समारंभ गेल्या रविवारीं तारीख ८ माहे मजकूर रोजीं शाळागृहांत झाला. समारंभस्थान फार उत्तम रीतीनें सुशोभित केलें होतें. रा. रा. देवराव जयकृष्ण तहाशिलदार हे अध्यक्ष स्थानीं होते. गांवांतील सभ्य गृहस्थ सावकार व सरकारी कामदार वगैरे १२५वर मंडळी जमली होती. सर्व लोक आपापल्या जागीं बसल्यावर रा. रा. सदाशिव गोविंद दामले शाळेचे हेड मास्तर यांणीं थोडक्यांत समारंभाचा उद्देश सर्वांस कळविल्यावर पहिल्या वर्गांतील एका मुलानें." उद्योग,, या विषयावर निबंध वाचिला. व कित्येक मुलांनीं इंग्रजी व मराठी कविता ह्मटल्या. नंतर अध्यक्षानीं मुलांस बक्षिसें वाटल्यावर मंडळीस चाली प्रमाणें विडे अत्तर गुलाब व मुलांस मिठाई वाटिली. शेवटीं कित्येक मुलांनीं शारीरव्यायामाचे काहीं प्रकार करून दाखविल्यावर समारंभाचें काम आटोपलें. एकंदरीनें समारंभाचा थाट व व्यवस्था व मुलांची कविता ह्मणण्याची शैली व सभाधीटपणा पाहून मंडळीस फारच आनंद झाला.

रा. रा. गब्रुसिंग यशवंतराव जमादार स्कूलकमिटीचे अध्यक्ष, यांणीं रुपये ३० व मेहेरबान हसूबाबा देशमुख, कामटिचे मेंबर, यांणीं रुपये १० मिळून ४० रुपये समारंभाप्रित्यर्थ खर्च करण्याकरितां दिले. ह्या रकमेपैकीं त्यांच्या इच्छेप्रमाणें २१ रुपये पुस्तकाकडे व ११ रुपये मिठाईवगैरेकडे खर्च केले व बाकीचे ८ रुपये गरीब मुलांच्या फीकरितां ठेविले. कळावें ही विनंती. तारीख १० माहे फेब्रुवारी सन १८८० इ.

एक अकोटकर.

वऱ्हाडसमाचार.

मिति माघ शुद्ध ६, शके १८०१

## मूर्खाचे धनी होण्यापेक्षा शहाण्याचे दास होणें बरें.

या वरील ह्मणीचा पुष्कळ लोक प्रसंगीं उपयोग करितात. विचार करून पाहिलें तर खरेंच आहे कीं, शहाण्याच्या नोकराचें आयुष्य जितकें सुखानें व निर्धास्तपणानें पार पडतें तितकें मूर्खाच्या धन्याचें पडत नाहीं. त्याला अधिक हाल व संकटें सोसावीं लागतात.

एका राजानें एक वानर पाळिला होता व त्यावर तो इतका विश्वास ठेवीत असे कीं, आपल्या निजावयाचे खोलींत पाहारेकऱ्या ऐवजीं अगदीं सन्निध त्यास बांधून शिपाई पहारेकरी यांस तो बाहेर ठेवित असे. त्याच गावांतील एका विद्वान ब्राह्मणाचे घरीं श्राद्धाकरिता तांदुळ वगैरे सामग्री नव्हती ह्मणून तो मिळविण्या करितां तो मंदिरांत रात्रीं शिरला; त्याच समयीं त्या वानराचे मनांत आपल्यास बाळपणापासून बंदांत ठेविलें वगैरे कारणावरून त्वेष येऊन तो राजाची तलवार तेथें होती ती हातीं घेऊन राजाचेच अंगावर धावून जात आहे असें ब्राह्मणानें पाहिलें व लागलीच खुंटीची तलवार घेऊन त्यानें सदर्हू वानरास छिन्नभिन्न केलें आणि आपली सामग्री घेऊन तेथें एक श्लोक लिहून ठेविला तो असाः—

" पंडितही शत्रु भला,
न मूर्ख हितकारकः
वानरें मारितां राजा.
विप्रें चोरेंहि रक्षिला॥१॥

नंतर त्या वानराचें प्रेत एका टोपली खालीं झाकून ठेवून आपण घरीं निघून आला. दुसरे दिवशीं राजाला फार आश्चर्य वाटून तो गावांतिल प्रत्येक ब्राह्मणास बोलावून सदर्हू श्लोकाचा भावार्थ विचारूं लागला. त्यांत सदर्हू ब्राह्मणाची जेव्हां गाठ पडली तेव्हां त्यानें सर्व वृत्तांत निवेदन केला त्यावरून वानरावर आपण व्यर्थ विश्वास ठेविला याबद्दल राजास पश्चात्ताप होऊन त्याने ब्राह्मणास बहुत देणगी वगैरे दिली."

अशीच माकडाचे मत्सर बुद्धीविषयीं अलीकडे दुसऱ्या पत्रांतून एक चमत्कारिक हकीकत प्रसिद्ध झाली आहे ती अशीः—

माकडाची मत्सरबुद्धि—जावा बेटांत माकडाच्या मत्सर बुद्धीची एक विलक्षण गोष्ट घडल्याविषयीं स्टेट्स टाइम्स पत्रांत प्रसिद्ध झाली आहे ती येणेंप्रमाणें:—

एको शेतकऱ्याच्या जवळ एक माकड जातीची मादी होती ती फार माणसाळलेली असल्यामुळें तिला कोठेंही जाण्याचा प्रतिबंध होत नसे. ती माकडी कोणास उपद्रव न करितां ल्हान मुलाशींही खेळत वागत असे. पुढें शेतकऱ्याच्या मनांत लग्न करण्याचें आल्यावरून त्यानें लग्न केलें, व तरूण वायको घरीं आल्यावर नवऱ्याचे हातून तिचें प्यार या माकडीसमक्ष होऊं लागलें. तेणें करून त्या माकडीणीचें वर्तन अगदीं बदललें व ती क्रोधी होऊन ज्यास त्यास चावूं लागली, याकारितां शेतकऱ्यानें ती माकडी काढून टाकण्याचा निश्चय केला व दुसऱ्या गावीं त्याचा सोबती शेतकरी होता त्यास ती देऊन टाकली. त्यानें तीस साकळीनें बांधून टाकिलें. अशा प्रकारच्या प्रतिबंधाची तिला मुळींच सवय नव्हती, त्यामुळें तिनें प्रयत्नानें सुटका करून घेऊन जंगलांत पळ काढिला. त्यास सुमारें १० महिने झाले, परंतु पांच दिवसांपूर्वीं त्या माकडीचा पहिला मालक घोड्यावर बसून जंगलांतून आपल्या मित्रास भेटावयास जात असतां सुमारें एक मैलावर गांव राहिला होता. इतक्यांत त्या माकडीनें त्याच्या पाठीवर एकाएकीं उडी मारून त्याच्या मानेस चावण्याची सुरुवात केली. त्यानें घोडा भरधाव काढून हां हां ह्मणतां ह्मणतां मित्राचें घर गांठलें. तेथें नौकरमाणसें धावून त्याचा सुटका केली, परंतु त्या पूर्वींच त्या माकडीनें पुष्कळ चावे घेऊन त्याचा उजवा कानही तोडला होता.

या दोन्ही गोष्टी वानरा माकडाच्या संबंधाच्या आहत तरी यांपासून एवढें उघड सिद्ध होतेंकीं, आपला शत्रु जरी आहे तरी तो शहाणा पंडित असावा कारण शहाणा विचारावाचून कोणतेंही अविचाराचें काम करणार नाहीं व यदाकदाचित् मूर्ख मनुष्य आपल्या हितासाठीं पुष्कळ झटणारा असला तरी तो आपल्या मूर्खपणाच्या योगानें काय काय अनर्थ करील याची कल्पना करवत नाहीं. एकानें ह्मटले आहे कीं ,, अश्वाची लाथ श्लाघ्य न श्लाघ्य खररोहण ॥ स्पर्धाहि युक्त ज्ञान्याची न युक्त मूर्खमित्रता ॥१॥ तात्पर्य विद्वान शत्रू पासूनही जो लाभ होतो तो मूर्ख मित्रापासून होत नाहीं. आतां मूर्ख व शहाणा यांविषयीं पुढील वेळीं विवेचन करू.

कालीदास नाटक—रा. रा. नानाभाई गणपराव धैर्यवान मुंबईकर यांचें नाटक गेले महिन्यांत एथें येऊन शनिवारपर्यंत त्यांचे खेळ ११ झाले त्यांचे संबंधानें प्रथमचा खेळ पाहून आह्मी आपलें मत दिलें होतें त्या आलीकडे तारीख २ फेब्रुवारीचे आमचे पत्रांत एक प्रेक्षक याचें पत्र आलेलें छापिलें आहे तें वाचणारांचें पाहण्यांत आलेंच असेल. पुन्हाही दुसरें पत्र त्याच संबंधानें ते लिहिणार होते परंतु त्यांकडून आलें नाहीं. अस्तु. आमचें असें मत आहे कीं सदर्हू लिहिणारांनीं जे कित्येक दोष दाखविले आहेत ते अगदी या नाटकांत नाहींत असें नाहीं; पण त्यांचें विदारण जरा कडक भाषणानें केलें आहे तितकी जरूर नव्हती. नानाभाईचे नाटकांत दोषापेक्षां गुणही बरेंच अधिक आहेत असें ज्यांनीं त्यांचे बहुतेक खेळ पाहिले असतील त्यांचे लक्ष्यांत आल्यावाचून राहणार नाहीं. आतां इतकें खरें कीं आलीकडे विद्वान लोकांची नाटकाविषयींची अभिरुची संस्कृत व इंग्लिश नाटकांचे ग्रंथ वाचण्यानें व कालजांतील मंडळीचीं नाटकें पाहिल्यानें जी ठरून गेली आहे तसा प्रकार नानाभाईचे नाटकांत आजवर दृष्टोत्पत्तीस आला नाहीं. वेणीसंव्हार, शाकुंतल, मृच्छकटिक इत्यादि नाटकांचे प्रयोग जर ते करतील तर त्यांची योग्यता हल्ली पेक्षां विशेष वाढेल. यांत संशय नाहीं. मागें एके ठिकाणीं मृच्छकटिक नाटकांचा प्रयोग त्यांनीं केला होता असें ऐकिलें व एथेंही करूं असें ते ह्मणत होते परंतु आजवर तयारी दिसून आली नाहीं व यापुढें होईल असें सध्याचे स्थितीवरून दिसत नाहीं मग पहावें. अको-

[illegible]ची वस्ती विद्वान, चतुर, व मार्मिक लोकांची बरीच आहे सबब एथें जुन्या चालीचे भारती व रामायणी खेळ करणारांचा विशेष [illegible] होईल असें नाहीं. पण त्याबाहेर नव्या [illegible]चीं आणि विद्वत्तेचीं नाटकें करणाऱ्या मंडळ्या अजून कोठें फैलावल्या नाहींत. इचल[करं]जीकर तशा प्रकारचे ३।४ खेळ आली [इ]कडेच चांगले करूं लागले आहेत. व रा. रा. धोंडोपंत सांगलीकर मृच्छकटिक [चां]गलें करितात याशिवाय त्या उभय मंडळ्यांचे ही बाकी खेळ पौराणिक प्रवृत्तींतीलच बहुतेक आहेत. व असेच खेळ करणाऱ्या बहुतेक सर्व नाटक मंडळ्या आहेत. तेव्हा नव्या परीच्या नाटकांच्या प्रयोगाचे गुणाशिवाय बाकी सर्व नाटक मंडळ्यांचे खेळापेक्षां नानाभाईचे पुराण प्रवृत्तीच्या नाटकाचे खेळ चांगले आहेत असें आह्मास वाटतें. त्यांनीं पदरचे हजारो रुपये या दोन वर्षांत हें नाटक जमविण्या प्रीत्यर्थ त्यांत घातले आहेत. सुमारें ५० मंडळी यांचे नाटकांत आहे ती सर्व पगारदार असून अमक्याचे नाटकांतील अमुक पात्र फार चांगलें आहे व तें यांजकडे येण्याजोगें आहे असें समजतांच हे त्यास मिळविण्याचा प्रयत्न करितात. दहा पंधरा वर्षांपूर्वीं जी मंडळी या कामांतील व्यास वाल्मिक याप्रमाणें जुन्या परीच्या नाटकांत निष्णात ती नानाभाईनीं संग्रहास ठेविली आहे. रावजी पवार, गोपाळराव दाते, कृष्णाजीपंत फडके, बळवंतराव डाके, इत्यादि नाटकदीक्षित गृहस्थ बहुत लोकांस पूर्वश्रुत आहेत व ते सर्व नानाभाईचे नाटकांत आहेत व ते आपआपलें काम मोठ्या चलाखीनें व शहाणपणानें करितात असें पुष्कळांनीं पाहिलें आहे. देखावे, पडदे वगैरे करण्याचे कामीं गणपतराव पेंटर फार चांगले कारागीर आहेत. तशीच पारू नावाची स्त्री आहे ती सुंदर, नवयौवना आणि कुशल असून ती या नाटकास एक भूषण आहे. आतां सर्वच मंडळी निवडक मिळणें व ती सारखी टिकणें अवघड आहे. "बाराभाईची खेती" ह्मणजे पुष्कळ वेगवेगळ्या नाटकांतील लोक जे स्वैरपणानें वागणोर ते एका मेळांत बहुत दिवस राहणें व त्यांस त्यांच्या तबेती संभाळून राहविणें ही गोष्ट फार नाजुक आहे व ती नानाभाईस इतपत तरी साधली याबद्दल आह्मी त्यांचा गुण घेतो. अस्तु. हें प्रकरण बरेंच वाढलें सबब आह्मी आतां तें आवरतो. नानाभाईचे मनांत या कामीं आपण विख्यात व्हावें व आपलें नांव चिरकाल रहावें असें असेलच आणि तसें असेल तर त्यांनीं संस्कृत व इंग्लिश नाटक ग्रंथाच्या भाषांतराचे प्रयोग पुष्कळ तयार केले पाहिजेत. तासगावकराकडे एक हुशार स्त्री होती तशा कांहीं स्त्रिया मिळविल्या पाहिजेत. व सर्वांस कळकळ रहावी ह्मणून मंडळींतून १०।५ हुशार गृहस्थांची कमिटी नेमून तिजकरवी वेळोवेळ तालमी करविण्याची व सुयंत्र देखरेख ठेवण्याची तजवीज राखिली पाहिजे. चांगलेंही पात्र आहे तरी तें उगीच फाजील पाल्हाळ करून एकादेवेळ कंटाळा आणितें तसें न झालें पाहिजे. तसेंच महिना दोन दोन महिन्यांनीं मंडळी नवी जुनी होणें हें नाटकाचे चांगुलपणास धोका आणणोर आहे. एथें आल्यावरच त्यांचे नाटकांतील ७ लोक निघून गेले व १२ नवीन आले. आणि ५० मंडळी नाटकांत असून शनिवारीं भीष्मपर्वाचे खेळांत कृष्णाचें व कर्णाचें काम एकाच पात्रानें केलें असें होत जाऊ नये. आतां यांचीं पात्रें वाटलीं जाऊन दोन नाटकें होणार आहेत. व एकावर ते अध्यक्ष राहून दुसऱ्यावर त्यांचे बंधू रहाणार आहेत. सबब उभयतांनींही आमच्या सूचनांचा विचार करावा असें त्यांस आमचें सांगणें आहे.

## वऱ्हाड.

बेरगावचे गोसावी घराण्यांतील सासवेसुनेचे हक्काबद्दल बरेच दिवस एथें डिपुटी कामिशनर कोर्टांत वाद चालू होता व या मुकदम्यांत एक दोन वेळां बारिस्टरही आले होते व वकील, मुख्त्यार वगैरेसाठीं हजारों रुपये खर्च झाला आहे पण त्याचा निकाल झाला नव्हता त्याचा नुकताच निकाल झाला आणि खामगाव मुक्कामीं आपसांत समजूत होऊन राजिनाम्यानें तंटामिटला हें कळविण्यास आह्मास संतोष वाटतो, या कामांत आमचे एथील रा. रा. गोपाळपंत आप्तीकर व सांगळूदचे रा. रा. गणपती पाटील यांनीं बरीच मेहेनत घेतली असें समजतें.

या मुकदम्यांत उभयतांकडून वर्तमानपत्रांत नोटिशी प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांना देखील शेपन्नास रुपये खर्च झालेले आहेत व ही हल्लींची तोडजोड झाली नसती तर एक एका पक्षास पांचपांच हजार रुपये इतक्यांत खर्च झाले असते व आणखी पुढें किती होते त्यांचा नेम नाहीं. सबब झाली गोष्ट फार चांगली झाली. व वादास पेटलेले बहुत लोक असें आपसांत समजत जातील तर त्यांचा बहुत प्रकारानें फायदा होऊन देशास सुस्थिति येईल.

खामगावचे स्मालकाज जडज मि० डनलप साहेब अडगाव कोर्टाचे कामाकरितां गेलेले अजून तिकडेच होते त्यामुळें खामगावाचें काम सुमार महिनाभर बंद राहिलें.

रा. रा. केशव महिपत खारकर अडगावचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांची प्रकृति दुरुस्त होऊन ते एथें आला व अडगावास जाऊन आपलें काम पाहू लागले.

औरंगाबादेस दिवाण साहेब व रेसिडेंट साहेब आणि आमचे जुडिशियल कमिशनर साहेब गेले होते. तेव्हां तिकडील मुलकी कामाची शिस्त फार चांगली पाहून त्यांनीं मे. रतनजी साहेब यांची तारीफ केली. तो जिल्हा त्यांचे हुकमतींतील आहे.

रा. रा. भास्कर सखाराम जु. क. चे क्लार्क यांनीं २० दिवसांची मुंबईस मुलांचे लग्नास जाण्याकरितां रजा मागितली आहे. तितक्या मुदतींत त्यांचे जागेवर रा. रा. गोपाळ महादेव भिडे स्मा. का. को. चे क्लार्क यांस आफिशियेटिंग नेमणार असें ह्मणतात.

माजी नाझरचे चिरंजीव रा. रा. विनायक नारायण कोलटकर यांचे कुटुंबास थोडे दिवसांपूर्वीं एक विलक्षण मूल झालें व प्रसूती समयीं फार जाचणी झाली. मि. डिसोजा साहेब डाक्टर यांनीं मोठ्या हुशारीनें व कारागिरीनें बाळंतिणीची सुटका केली. मूल शस्त्रक्रियेनें काढावें लागलें. त्याचें डाकें साधारण मुलाच्या डोक्याच्या चौपट मोठें होतें व कपाळावर कांहीं मूर्तीसारखी आकृती होती डोळे व नाक नसून तोंड मात्र होतें. कांहीं तास तें विलक्षण मूल ठेविलें होतें नंतर त्याची व्यवस्था झाली.

खामगावचे पोलिस इन्स्पेक्टर इलिचपुरास, तेथील वणीस व वणीचे रा. रा. रामजी शाळीग्राम यांस खामगावांस नेमिलें.

उमरावतीचे डिपुटी कमिशनर व पोलिस सु० रजेवर जाणार आहेत.

ट्राव्हलिंग अलावन्स ह्मणजे सरकारी कामदारास फिरण्याचा भत्ता मिळत असतो त्याचें प्रमाण अलीकडे फार कमी केलें आहे. त्यांत शाळाखात्याकडे तर फारच कमी केलें याबद्दल आह्मांस आश्चर्य वाटतें. डिपुटी कमिशनर व असिस्टंट कमिशनर यांस दररोज ५ रु. भत्ता मिळणार आणि डायरेक्टर साहेबांस ४ रु. मिळणार. इन्स्पेक्टरास ३ रु. आणि डिपुटी इन्स्पेक्टरास एकच रुपया मिळणार !

खामगावचे वकील रा. रा. बळवंत बापुजी यांजवर ७ वर्षांपूर्वीं सरकारची कांहीं इतराजी होऊन त्यांनीं बुलढाणें जिल्ह्यांत वकिली करू नये व कोणत्याही जिल्ह्यांत नेटिव न्यायाधिशापुढें वकिली करू नये असा ठराव झाला होता. पण त्यांच्या आर्जावरून आ. रेसिडेंट साहेबांनीं तो ठराव रद्द करून त्यांस इतर वकिलांप्रमाणें सर्वत्र मोकळीक दिली हें ऐकून आह्मास संतोष वाटतो.

मुंबईकर चिंतामण पुराणिक यास चोरीचे अपराधांत एक महिना सक्त मजुरी कैद व १० रुपये दंड अशी शिक्षा झाली.

यवतमाळचे क्लार्क आफ धी कोर्टची जागा खाली आहे व वाशिमचे तहशीलदारास सहा महिन्यांची रजा घेण्याचा हुकूम झाला आहे तेव्हां या दोन जागा भरतांनां आमचे कमिशनर साहेब इकडील वऱ्हाडवासी विद्वान् गृहस्थ रा. रा. हरी रामचंद्र रोहणखेडकर बी. ए. यांजकडे लक्ष पुरवितील अशी आह्मांस उमेद आहे. वऱ्हाडच्या सुशिक्षित लोकांस अधिकाराच्या जागा देण्या विषयीं अलीकडे रेसिडेंट साहेबांचें अश्वासनही आहे तेव्हां लवकरच प्रसंग आला आहे तो सदर प्रमाणें सिद्धीस नेल्यास इकडील लोकांस संतोष होईल.

सर्टिफिकिटें व बक्षिसें— जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस उमरावतीस अलीशान रेसिडेंट साहेबांनीं दरबार भरविला त्या प्रसंगीं साह गृहस्थांस सर्टिफिकिटें व सहा गृहस्थांस बक्षिसें दिलीं त्यांची यादी रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध झाली आहे ती त्यांचे त्यांचे कारणासहित आह्मी एथें घेतों.

उमरावती जिल्हा.

१ परशराम पाटील पुसदेकर यांनीं उमरावतीच्या लायब्ररीची इमारत बांधण्यासाठीं १००१ रुपये बक्षीस दिले त्यासाठीं रेसिडेंट साहेबांनीं त्यांस बहुमानाचें सर्टिफिकिट दिलें.

२ हरबाजी पाटील हिवरखेडकर यानें भैबलखा याचे खुनाचे प्रकरणांत साक्षी पुरावा मिळविण्याचे कामीं फार मेहनत घेतली त्यासाठीं त्याला ५० रुपयांचा दुशाला व पोलिस सुप्रिंटेंडेंट साहेबाच्या सहीचें सर्टिफिकीट मिळालें.

अकोला जिल्हा.

३ बाबुजी पाटील हिसांगकर यांनीं अकोल्याच्या टाऊनहालापुढें कारंजे बांधण्यासाठीं ७०० रुपये दिले, त्यासाठीं रेसिडेंट साहेबांनीं त्याला बहुमानाचें सर्टिफि. दिलें.

४ गणू चवकीदार वाडेगावकर यानें विहिरींत पडलेले एके मुलास मोठे धैर्यानें बाहेर काढून वाचविलें त्याकरितां त्याला १० रुपये बक्षीस दिले.

५ किसन पोलिस पाटील पिंपरीकर यानीं कासोदचा लाकडाचा बाजार भरविण्याचे कामीं चांगली खटपट केली सबब त्यांनां ५० रुपयांचा दुशाला बक्षीस दिला.

६ अयाजी पाटील दाडमकर यानीं ५ ह्मशींचा कळप चोरीस गेलेला पकडण्याचे कामीं चांगली मेहनत घेतली सबब त्याला १० रुपये बक्षीस दिले.

७ शेखमलंग पिंजरीकर यानें एक प्रसिद्ध बदमाश पकडला त्यासाठीं त्याला १० रुपये बक्षीस दिले.

इलिचपुर जिल्हा.

८ रणजीतसिंग मेळघाटचे बाजारइन्स्पेक्टर यानीं पहाडी लोकांच्या सुखार्थ कांहीं विशेष कामें केलीं त्या करितां रेसिडेंट साहेबानीं त्याला बहुमानाचें सर्टिफिकेट दिलें.

वाशीम जिल्हा.

९ बाळाजी गोसावी फळमगणकर यानीं ५००० रुपये खर्चून एक मोठी धर्मशाळा बांधिली त्या करितां त्याला रेसिडेंट साहेबानीं बहुमानाचें सर्टिफिकेट दिलें.

१० रामजी पाटील असोलीकर यानीं त्यांचे गांवांतील गुरें चोरून नेणारांचा मागलाईंत जाऊन पाठलाग केला व त्यांस धरून त्यांवर आरोप शाबीद करविला त्यासाठीं त्याला २५ रुपयांचा मंदील दिला.

यवतमाळ जिल्हा

११ इसातयब यवतमाळकर यानीं कळम रस्त्यावर ५०० रुपये खर्चून एक विहीर बांधली व मुसलमान लोकांकरितां एक इदगा बांधिला त्या करितां त्याला रेसिडेंट साहेबानीं बहुमानाचें सर्टिफिकेट दिलें.

१२ हरबा मोरे सिरपुरकर यानीं वेणी एथें ३०० रुपये खर्चून विहीर बांधिली व एक मुशाफरखाना बांधिला तसेंच बेरी, पिंपळगाव, आणि यवतमाळ एथील लोकांचे उपयोगाकरितां विहिरी बांधिल्या त्यासाठीं रेसिडेंट साहेबानीं त्यास बहुमानाचें सर्टिफिकेट दिलें.

अकोला व उमरावती ह्या दोन ठिकाणीं सेंट्रल जेल आहेत ते मोडून एक मोठा सेंट्रल जेल अकोलें किंवा उमरावती येथें ठेवण्या विषयीं वाटाघाट बरेंच दिवसपासून चालली होती. हल्लीं असें कळतें कीं, सदरहू व्यवस्था लवकरच अमलांत येणार आहे. उ. अ.

## वर्तमानसार.

ग्वाल्हेरचे मुख्य सरदार शिताळ साहेब बहादर यांचे एजंट व कवीवचनसुधा या काशींतिल पत्राचे मालक व कर्ते रा. रा. चिंतामणराव बाळकृष्ण धडफळे बडोद्यास लग्न समारंभाकरितां आले होते ते हल्लीं एथें मुंबई शहर पाहण्याकरितां आले आहेत.

ऐरलंड फंडाकरितां गायकवाड सरकारची ह्मणून तीन हजारांची रकम राजे सर टी. माधवराव यांनीं मि० डोसाभाई यांजकडे पाठविली असें त्यांच्या छापलेल्या पत्रावरून कळतें.

आह्मांस लिहिण्यास फार वाईट वाटतें कीं रेवाचे महाराज वारले. सर हेनरी डेली रेवास जाणार आहेत असें इंदूरच्या तारीख ६ च्या तारेवरून कळतें.

भावनगरचे खाडीवर नवीन मणक्याचे होडी चालविण्याचा समारंभ झाला हे तारीख ३१ चे तेथील तारेवरून कळतें.

गवरनर जनरल यांच घांत मोचनार्थ स्मारक कृत्य.— काश्मिरचे महाराजांनीं कलकत्ता एथील धर्मार्थ दवाखान्यास दोन हजार रुपये दिले. शिवाय १०,००० रुपये किमतीचें लांकूड लाहोर एथें गोरे लोकांचे देऊळ बांधण्याकरितां दिल्याचे ता० १९ चे अमृतबजार पत्रिकेवरून समजतें. घरचें झालें थोडें आणि व्याह्यानें धाडलें घोडें हा न्याय होय.

भयंकर संहार— काश्मीर एथील पांच लक्ष प्रजे पैकीं दुष्काळ संबंधानें तीन लाख लोक यमसदनी गेले असें ह्मणतात.

इगतपुरी एथें भयंकर वाख्याचा उपद्रव सुरू झाला आहे व गेले सोमवारीं वीस पासून तीस मनुष्यें मरण पावलीं असें समजतें.

ने. ओ.

या आठवड्यांत काबुलचे लढाईकारितां जलमार्गानें रवाना होण्यासाठी चोहींकडून सारखे लष्कर दररोज मुंबईस येत आहे व जलमार्गानें रवाना होत आहे. या योगानें कापाचे मैदानांत, व्याकबेवर व पालवबंदरीं सारखीं गजबज सुरू आहे. तशीच गोदी व कमिसारिएट खात्यांतही रात्रंदिवस काम चालू आहे.

रा. ब. नाना मोरोजी यांनीं पुढें चाकरीवर राहण्याविषयींची परवानगी मागितली होती ती नामंजूर झाल्याचे कळतें.

काश्मीरचे महाराज इंग्रज सरकारास काबूलच्या लढाईस ह्मणून २० हजार घोडी मदत देणार आहेत अशी वदंता आहे.

आफगाणिस्थानांत पाठविण्याकरितां नोकरांची जरूर आहे याजकरितां ज्यांची जाची जाण्याची खुषी असेल त्यांस सरहद्दीपर्यंत ९ रुपये पगार मिळेल, व पुढें ८ रुपये पगार व पोटखर्च वगैरे मिळेल अशाबद्दल सरकारांतून लिहून आलें आहे.

पार्शी लोकांचे पुणें एथील गुरू खा. ब. दस्तुर नसरवानजी जामास्पजी यांचे नाव मुंबई सरकारानें दक्षिणेंतील सरदार लोकांच्या पटांत पहिल्या प्रतींत दाखल केलें ह्मणून कळतें.

श्री. गणपतराव पानशे यांणीं आपण फ. क्ला. सरदार आहोत यास्तव हायर स्थ्यांडर्डचे परीक्षेस जाण्यास परवानगी मिळावी ह्मणून मुंबई सरकारास याद पाठविली होती. सरकारानें त्याच्या मागण्याअन्वयें मंजुरी दिली.

अमृतसर एथें लोंकरीचा कारखाना होण्याचें घाटत आहे.

काबुलचे लोकांत अस्वस्थता असून पुन्हा महमद जान हल्ला करणार आहेत. गडमक व जलालाबाद एथील फौजेस हुकूम होतांच तयार असावें अशाविषयीं हुकूम पाठवल्याचें अलाहाबादचे तारीख २ चे तारेवरून समजतें.

चिनांत इंग्लडचे कापडापेक्षां अमेरिकेंतील कापड फार पसंत पडून त्याचां खपही फार होत असल्याचें कळतें.

काबुलच्या आसपास तारीख १ रोजीं डोंगरावर वगैरे दहा तास सारखा बर्फ पडला.

मद्रास इलाख्यांत पब्लिक वर्क्स खात्या संबधोंने लोक कमी करण्याचें आहे. २७ अकौंटंट्स कमी केले. एकंदर ८ लाख रुपये खर्च कमी करण्याचा इरादा आहे.

आस्ट्रियन सरकार वियन्ना शहराकारितां किल्ल्याची वगैरे तजवीज व दुसरा बंदोबस्ताचा विचार करावयास लागले. उद्देश काय असेल तो असो.

ऐरलंडच्या दुष्काळ निवारणाचे फंडास सर सालार जंग यांणीं मद्रासेंतील रिलिफ फंड कमिटीकडे २००० रुपये पाठविले आणि निजाम सरकाराकडून आणखी कांहीं तजवीज करवितों ह्मणून सूचक पत्र गेले आहे.

काबुलच्या आसपास लहान गढ्या बांधण्याचा आमच्या सरकारच्या फौजेचा विचार चालला आहे.

बातमी खोटी.— श्रीमंत गाईकवाड सरकारचे विवाहोत्सवाबद्दल झालेला खर्च दिवाण राजा सर. टी. माधवराव हे राज्यांतील सरदार व जहागीरदार वगैरें लोकांकडून शेकडा १० टक्के प्रमाणें भरून घेणार ही बातमी सर्वथैव निर्मूल आहे असें टा. इं. च्या 'आर' नावाचा बातमी दार लिहितो.

गिझनीवर एकदम हल्ला करण्यास जनरल राबर्टस यांनीं पेशावराहून तोफखाना मागविला आहे असें समजतें. इं. प्र,

---

## भोजनविधि

जितके पदार्थ मनुष्यमात्र आपल्या खाण्यांत ह्मणून उपयोग करितात तितक्यांस अन्न अशी संज्ञा आहे. शरीराच्या उपजीवनास व पुष्टीकरणास या सर्व पदार्थांचा उपयेग होतो. जसा सर्पणाशिवाय अग्नि प्रदीप्त होत नाहीं, त्याचप्रमाणें अन्नाशिवाय शरीराची उपजीविका होत नाहीं. जसा अग्नि सर्पणाला जाळून त्यापासून राख, धूर इत्यादि अनेक पदार्थ उत्पन्न करतो तद्वत् अन्नापासून जठरांत निरनिराळे पदार्थ उत्पन्न होऊन ते रक्तद्वारें सर्व शरीरांत भेदून सर्व इंद्रियांस पुष्टीकरण देतात. व जसें सर्पण कमी झालें ह्मणजे अग्नि मंद होत जातो व तें अगदीं सरलें ह्मणजे नुसते निखारे राहून कांहीं वेळानें कोळसे व राख मात्र रहाते त्याचप्रमाणें मनुष्याचें जीवन अन्नावांचून होत नाहीं व तें जितकें मिळावें तितकें न मिळालें तर शरीर कृश झाल्याशिवाय राहाणार नाहीं. ह्मणून प्रत्येकानें आपआपल्या नेहमीच्या कामाप्रमाणें कोणत्या प्रकारचें अन्न खालें असतां आपले हातपाय सुरक्षित राहून आपल्या नित्यक्रमास अडथळा येणार नाहीं याकडेस अवश्य लक्ष दिलें पाहिजे. पुष्कळ काम करणारास अधिक पुष्टिकारक अन्न सेवन करावें लागते इतकेंच नाहीं तर ज्याची क्षुधा व पाचनशक्ति कमी त्याच्या हातून एकादें मेहनतीचें किंवा घाईचें काम होणेंही कठीण. हा नियम अंगमेहनत करणाऱ्यास लागू आहे. सक्त मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांस जितकी जास्त अन्नाची जरूरी असते तितकी एकाद्या भटकणाऱ्या विचारशून्य मनुष्यास नसते. ह्मणून जितके श्रम करणारे लोक आहेत त्यांणीं अन्नसेवनांत अतिशयच चवकशी व हुशारी राखली पाहिजे कारण नुसतें पुष्कळ खाऊनही उपयोग नाहीं. अन्न घेणें तें थोडें असून चांगलें पुष्टीकारक असलें पाहिजे. नाहीं तर काय हो ते रामभट शंभर जिलब्या एका बैठकीस उडवितात. भटजीबुवाकडेस पहाल तर हुबेहुब मृत्यूची प्रतिमा. ह्यास काय आहार ह्मणावा? हा एक प्रकार झाला. दुसरा असा कीं आमचे कित्येक लोक एकाच पदार्थावर उपजीविका करतात. भात तर नुसता भातच. अशा खाण्यानें शरीर नीट रहात नाहीं. कारण अस्थि, मांस, मज्जा इत्यादि निरनिराळ्या भागांचें पोषण होण्यास निरनिराळ्या पदार्थांचीं अन्नामध्ये गरज लागते ती फक्त भात किंवा जिलबी खाऊन होत नाहीं. यासाठीं जें अन्न सेवन करायोंच तें निरनिराळ्या पदार्थांनीं मिश्रित असून वर सांगितल्याप्रमाणें थोडें परंतु पौष्टिक असावें. अशा प्रकारचें अन्नानें पाचन क्रियेस मेहनत थोडी पडून शरीरास पुष्टी अधिक येते व अन्नाचा श्लेषही शरीर द्वारें फार जात नाहीं. ह्या सर्व गोष्टी अन्नांत मांस, निरनिराळीं उंचीं धान्यें, व भाजीपाला व फळफळावळ ह्या सर्वांचें योग्य मिश्रण केल्यानें होतात. ह्या विषयीं जास्त विचार पुढें करूं.

अन्नाच्या जाति.

वर्ग १ नेहेमी किंवा अवश्य लागणारे अन्न. जाति १ खनिजद्रव्यें उ० पाणी, क्षार, वनस्पति व निरनिराळे जीवजंतूंतील क्षार.

,, २ जाळलीं असतां ज्यांचा कोळसा होतो अथवा जीं शरीरांत गेलीं असतां श्वासोश्वासावाटे निघून जातात किंवा जीं शरीरांत गरमी आणून बलवृद्धि करणारी उ. निरनिराळ्या धान्यांची खळ, शर्करा, चरबी, तैलें व आम्ल पदार्थ.

,, ३ ज्यांत नैट्रोजन आहे अथवा पौष्टिक किंवा ज्यापासून स्नायू पुष्ट होतात उ० अंड्यांतील पदार्थाच्या जातीचीं, मांसाच्या जातीचीं अथवा दह्यांच्या जातीचीं.

वर्ग २ इतरांशीं मिळून असणारीं अन्नें. उदाहरणें वनस्पतींतील तंतु, गोंद, अस्तिपाक. वर्ग. ३ औषधी किंवा दुसऱ्यांस मदत करणारीं. जाति १ उत्तेजक. उ० मद्यें, उडून जाणारीं तैलें.

मज्जामंडळांवर आपला अंमल बसविणारीं. उ० चहा, कॉफी, तंबाखू, अफु इ०. कोठलाही प्राणी घेतला तरी त्याच्या आहारार्थ उद्भिज्ज पदार्थांची जरूरी आहे असें स्पष्ट दिसून येतें. वरील वर्गापैकीं एकच पदार्थ घेऊन त्यावरें त्याची उपजीविका चालवीन ह्मटलें तर अवश्य आहे. नुसती साखरच खाऊन राहीन ह्मटलें तर मृत्यू जवळच आला असें समजलें पाहिजे. तसेंच वरालि एकाच जातींतील पदार्थावर मनुष्य निर्वाह करूं लागला तर शरीर आरोग्यदशेंत न राहातां दिवसेंदिवस कृश होत जाईल. तर निदान पहिल्या वर्गांतील तीनही जातींपैकीं प्रत्येकीमधून थोडथोडें तरी भाक्षिलें पाहिजे. उदाहरणार्थ लहान मुलांचें ईश्वरदत्त अन्न दूध हेंच आहे यांत पाहिल्या वर्गांतलि सर्व जातीचे पदार्थ सांपडतात. ते असे.

आईच्या स्तनांतील दूध. यांत:—

| | |
|---|---|
| पाणी | ८९० |
| दहीं ( केसीन ) | ३५ |
| लोणी | २५ |
| साखर इत्यादि | ४८ |
| क्षार | २ |
| | १,००० |

क्षारामध्यें लाईम, फासफेट, आलकली व थोडा लोहही असतो. आतां यांतील प्रत्येक पदार्थ पाहिला तर मुलाच्या पोषणार्थ अवश्य आहे. असेंही असतां एकादा तरुण पुरुष ह्मणेल कीं मी नुसता दुधावरच राहीन तर चालणार नाहीं. कारण मनुष्याच्या अन्नांत इतका मोठा पाण्याचा अंश नको व त्याला तिसऱ्या वर्गांतील पदार्थांची जरूरी असते. कोणी अशी शंका घेईल कीं, दुधाचा खवा बनविला ह्मणजे नाहींका चालणार, तर खवा फार जड असतो व दूध जिरण्यास ह्मटलें ह्मणजे तें पातळ पाहिजे. एकाच जातीच्या अन्नावर जिवाचें रक्षण होतें किंवा नाहीं हें पाहण्याकरितां जनावरास कांहीं दिवस पर्यंत एकच पदार्थ देऊन पाहिलें आहे, आणि तीं सर्व जनावरें एक महिन्याच्या आंत मेलीं. कोंकणस्थ लोकांत नुस्ता भात खाण्याचा प्रचार फार असल्यामुळें त्यांत पुष्कळ लोक नेत्र रोगानें नेहमी पीडित असतात असें डा० बड यांचें मत आहे. ते ह्मणतात कीं, एकाद्या कुत्र्यास जर कांहीं दिवस पर्यंत नुसत्या भाताशिवाय दुसरें कांहीं खावयास दिलें नाहीं तर त्याचे डोळे फुटतील ज्या पदार्थांत नैट्रोजन नाहीं अशावर जर जीवन चालविलें तर प्राणी फारकाळ पर्यंत जिवंत रहात नाहीं. परंतु शरीरांत ऊब उत्पन्न करण्याच्या कामांत ह्या पदार्थांचा फारच उपयोग पडतो. स्नायूंस मात्र यापासून कांहींच मदत मिळत नाहीं. सु. प.

---

## नोटिस.

भागू मर्द बापु गांवडे हल्लीं वस्ती मौजे दहिवडी तालुके मलकापुर जिल्हे बुलढाणें इजकडून बापु वल्लद सदाशिव गांवडे राहणार मौजे निपान प्रगणें पिंपळगाव राजा तालुके मलकापुर जिल्हे बुलढाणें. यांस कळावें कीं, मी तुमची लग्नाची बायको असून मजला आठ वर्षांपासून वागवीत नाहीं व अन्न वस्त्रही देत नाहीं करितां या नोटिसीनें प्रसिद्ध करण्यांत येते कीं नोटिस पावल्या तारखेपासून पंधरा दिवसांचें आंत माझे वागविण्याचा व अन्न वस्त्राचा निकाल सदर्हू मुदतीचें आंत करावा. अगर मजला फारकती मिळावी नाहींपेक्षां मी दुसरा नवरा करीन कळावें. तारीख ६-२-८० इसवी.

( सही ) भागू मर्द बापु गावडे हल्लीं
वस्ती दहिवडी निशाणी
बांगडी.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाड समाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख २३ माहे फेब्रुवारी सन १८८० इसवी. अंक ८


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## कौमुदीमहोत्साहः

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें "सिद्धांत कौमुदी" संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षडलिंग. अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तीपूर्वभाग इतकें संपूर्ण झालें, पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शद्बांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठे. किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प. ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा, पण वर्षाची वर्गणी अगाऊ चार रुपये पाठविल्यास टपालखर्च नाहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनी उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मांस "पोष्टपेड" पत्रीं कळवावें ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

रामचंद्र भिकाजी गुंजीकर
कौमुदीमहोत्साहकर्ते.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८

COMEDY OF ERRORS.

## कामडी आफ एरर्स.

अथवा

## भ्रांतिकृत चमत्कार.

या नावाचें शेकस्पियरच्या इंग्लिश नाटकाचे भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरलेला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे. असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेतून मागविल्यास हशिलाबद्दल अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## नवीन दिवा[illegible] कायद्यासंबंधी [illegible].

वऱ्हाडाकरितां अलीशान रेसिडेंट साहेबांनीं तयार करून रेसिडेन्सी आर्डरमध्यें जीं नवीन दिवाणी कायद्यासंबंधी सर्क्युलरें छापून प्रसिद्ध केलीं व ज्यांचे मराठी भाषांतर मे० जुडिशियल कमिशनर साहेबांनीं छापवून कोर्टांनिहाय दिलें त्याच्या प्रति वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किंमत ६ आणे बाहेर गांवीं एक आणा अधिक पडेल.

## नोटिस

रा. रा. हरीचंद वल्लद चिमणाजी देशमुख राहणार मौजे भांबेरी तालुके अकोट यास तुकाराम वल्लद दुर्गाजी देशमुख राहणार कसबे बार्शीटाकळी तालुके अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तह्मी नोटिस दिली ती पावली त्या नोटिसींत जो मजकूर आहे तो सर्व खोटा आहे एकही खरा नाहीं. कारण मी आपली कन्या तुमचे बंधूस दिली नाहीं व मी १०० शंभर रुपये ही घेतले नाहींत. तुह्मी माझे मुलीला पाहण्या करितां आले होते तेव्हां मी बोललो होतो कीं या सालास लग्न करीत नाहीं असा जबाब दिला होता तर तुह्मी १०० रुपये नोटिसींत लिहिले हे सर्व तुफान आहे. मी कांहीं तुमचे रुपय पाहिले नाहींत व तुमशी सोयरीक ही केली नाहीं. व असे शंभर रुपये घेतल्याचें तुफाण मागें लाविल्यानें सोयरीक होते असें मुळींच नाहीं. पण तुह्मी आमचे माई बिरादराचे नादीं लागून हा व्यूह रचिला असावा. तथापि या तुफाणाबद्दल तुह्मास कोर्टांत जबाब द्यावा लागेल कारण शंभर रुपये घेतले हें लिहिणें आमचे आब्रूस धक्का लावणारें आहे. शिवाय हा नोटिसीचा खर्च तुह्मी व्यर्थ करणें भाग पाडलें तर तो सर्व खर्च तुह्मापासून घेतला जाईल. कळावें तारीख १८ माहे फेब्रुवारी सन १८८० इसवी.

( सही ) तुकाराम वल्लद दुर्गाजी देशमुख निशाणी हातची असे.

## नोटिस.

सदाराम खेमराज मारवाडी वहिवाटदार मोतीलाल मारवाडी दुकान अकोट तालुके मजकूर यास खालीं सही करणार याजकडन नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मास आह्मी २५०० रुपयाचा ताबेगहाण खताचा दस्तैवज करून दिला त्यांत जी जिनगी तुह्मास गहाण करून दिली आहे तीच मिळकत मी आतां दुसऱ्याचे ताब्यांत देऊन तुह्माकरितां रुपये काढले आहेत तेव्हां गहाण करून दिलेले जमीनीवर व आमराईवर आतां तुमचे हक्क राहिले नाहीं. कारण मी रुपये देण्यास तयार असून तुह्मी घेत नाहीं. सारांश आतां तुह्मी चार दिवसांचे आंत आपले रुपये घेऊन पावती देऊन माझे दस्तैवज मजला परत द्यावे. असें न केल्यास गहाण मालावर तुमचा हक्क नसून मग मी कोणते प्रकारें देवाल नाहीं. याजबद्दल योग्य नोटिसीचा जबाब द्यावा जानिजे. तारीख १९ माहे फेब्रुवारी सन १८८० इसवी.

( सही ) महमद अजीम वल्लद महमद रजा इनामदार याचे हातची केली असे

## नोटिस.

मलूजी वल्लद नारायणजी यऊतकार वस्ती मौजे आगिखेडें प्रगणें पातुर शेखबाबू तालुके बाळापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमची तुह्माकड आठ शेरी पायलीची १० मण जवारी असून त्याबद्दल तुह्मी पांच पांच मणाचे दोन पुर्जेही लिहून दिले आहेत ही ज्वारी तीन वर्षांचे वाढीदिढी सुद्धां येणें आहे ती देतों देतों ह्मणून देत नाहीं ह्मणूनही मुद्दाम नोटिस दिली आहे ही पावल्यापासून ८ दिवसांत सर्व ज्वारी आणून द्यावी नाहींपेक्षां कोर्टांतून तजवीज करू. खर्च तुह्मावर बसेल. कळावें, तारीख १९ फेब्रुवारी सन १८८० इसवी.

( सही ) रामजी वल्लद राघोजी बनछोड वस्ती आगिखेडं निशाणी खुद.

## नोटिस.

राघ्या वल्लद सटव्या नाक महार यास जामीन शामनाक वल्लद शिवनाक महार वस्ती मौजे आगिखेडं प्रगणें पातुर शेखबाबू तालुके बाळापुर यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं आमचे तुह्माकडे मुद्दल रुपये २८ व शिवाय व्याज येणें आहे व याचे एक १६ रुपयांचा व एक १२ रु. चा असे दोन पुर्जे आह्माजवळ तुमचे आहेत एक वर्ष होऊन गेलें, देत नाहीं सबब ही मुद्दाम नोटिस दिली आहे ही पावल्यापासून ८ दिवसांत सर्व रुपयांची आदाई करावी नाहींपेक्षां उभयतांवर फिर्याद करून रुपये घेतले जातील. कोर्ट खर्च व या नोटिशीचा खर्च तुह्मावर बसेल कळावें तारीख १९ माहे फेब्रुवारी सन १८८० इसवी.

( सही ) रामजी वल्लद राघोजी बनछोड वस्ती आगिखेडें निशाणी खुद.

## नोटिस

भगवान वल्लद संभाजी पाटील खंडोर वस्ती मौजे खानापुर प्रगणें पातुर यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं आमचे तुह्माकडे मुद्दल रुपये १२॥ साडे बारा व शिवाय व्याज येणे आहे ते तुह्मास दोन तीन वेळा मागितले असतां देत नाहीं सबब ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून ८ दिवसांचे आंत व्याजासुद्धां सर्व रुपये आणून द्यावे न दिल्यास फिर्याद करून रुपये घेऊं कोर्टखर्च व या नोटिशीचा खर्चही तुह्मावर बसेल कळावें ता. १९ माहे फेब्रुवारी सन १८८० इसवी.

( सही ) रामजी वल्लद राघोजी बनछोड आगिखेडं निशाणी खुद हातची.

## नोटिस.

रामजी वल्लद श्रावण निसाळ गवळी वस्ती मौजे आगिखेडे प्रगणे पातुर यास चंद्रभान वल्लद हैबती पाटील वागजाळीकर प्रगणें पातूर याजकडून देण्यांत येते कीं, तुमचें लिंबाचें झाड आह्मी तुह्मापासून १० रुपयांस ठरवून घेतलें. व त्याप्रमाणें रुपये रोख दिले. ८ दिवसांनीं झाड तोडून न्यावें असा करार होता त्याप्रमाणें लिंब तोडावयास आह्मी माणसें लाविलीं असतां पाटलानें मनाई केली तेव्हां तुह्माला दुसरें झाड किंवा रुपये मागितले त्यास एक वर्ष झालें देत नाहीं सबब ही मुद्दाम नोटिस केली आहे तर रुपये व्याजासुद्धां द्यावे व नोटिशीचा खर्च द्यावा. नाहींपेक्षां फिर्याद करून या नोटिशीचे खर्चा सुद्धां रुपये भरून घेऊ. कळावें. तारीख १६ माहे फेब्रुवारी सन १८८० इसवी.

(सही) चंद्रभान वल्लद हैबती पाटील निशाणी खुद हातची.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा- वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. तारीख १ फेब्रुवारीं रोजीं मूर्तिजापुर एथील कांहीं मंडळीची सभा तेथील सरकारी शाळेंत भरली होती. ते समयीं प्रत्येक आठवड्यास सभा अदीतवारीं भरत जावी व सभेंत प्रेसिडेंट मेंबर वगैरे लोकांची योजना झाली. व सभेस (मूर्तिजापुर वक्तृत्वोत्तेजक) असें नाव देऊन तत्संबंधी नियमही ठरले गेले.

सभेचे वेळीं सिरसो एथील स्कूल मास्तर रा. रा. दामोदर कोंडदेव चिंचपुरकर यांणीं व्यायामापासून मनुष्यमात्रास काय फायदे होतात हें सभाजनास कळविलें. नंतर वामनराव मास्तर मूर्तिजापुर यांणीं विद्येपासून फायदे या विषयावर व श्रीनिवास राव आपा वकील ए. अ. क. कोर्ट मु. यांचीं संभाषणें झाल्यानंतर सभा विसर्जन झाली. सभेस शेट सावकार व सरकारी कामदार येण्याची तसदी घेतात त्याप्रमाणेंच वारंवार आपल्या अमोल्य वेळांपैकीं थोडा वेळ इकडे खर्च करून देशहितार्थ झटतील अशी आशा आहे.

कळावे ९ माहे फेब्रुवारीं सन १८८०
मुक्काम मूर्तिजापुर.

आपला सभेस जाणारा
एक "क्ष"

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. महाराज आपण वऱ्हाडचे समाचार ते ह्मणविता तस्मात् याचे आद्यंत स्थितीची आपणास माहिती असलीच पाहिजे तथापि दाद मागण्याच्या हेतूनें दोन ओळी सादर करितो त्याचा आव्हेर न करितां प्रसिद्ध कराल अशी आशा आहे

या वऱ्हाड प्रांतातील शेतकीकडे पाहिले असतां इकडील जमीन जरी साधारण प्रतीचीच आहे तरी इकडे जवारी, कपाशी, गहू, हरभरे, लाख, मूग, उडीद, तुरी मसूर, मठ थोडे, तांदूळ, तंबाखू, आंबा, व जांभूळ हीं पिकें ऋतुमानानें व पर्जन्यवृष्टीनें होतात. या शिवाय बागाइती ( घातल्या पाण्यानें ) ऊस, केळी, पेरू, निंबे, अफू. जव, व भाज्यांचीं फळफळावळें उत्पन्न होतात.

वऱ्हाडांत खडसपट्टी व देशपट्टी असे भाग वऱ्हाडी लोकांनीं मानिले असून ते खडकळ व काळी या रूपानें प्रसिद्ध आहेत. शीवायघाट वगैरेचाही वऱ्हाडांत अलीकडे समावेश झाला आहे. यांत खडसपट्टा खरीपाचे पिकाला चांगली असून शिंदीवनाचेही बरेंच उत्पन्न असते. व देशपट्टींत रबी ह्मणजे गहू वगैरे चांगले पिकतात. याशिवाय अकोट तालुक्यांत वगैरे शेकडो किंबहुना हजारो खारिक मिठाच्या पाण्याच्या विहिरी असून थोड्या वर्षां पूर्वीं त्या विहिरींतून पाणी काढून मीठ तयार करण्याकडे हजारो लोक गुंतलेले रहात होते व हजारो रुपयांचें उत्पन्न होत असे; व ते मीठ इकडे इतकें विपूल होत असे कीं एका आण्याला तीन चार शेर विकावयास सांपडत असे; परंतु त्या विहिरींतून मीठ काढविण्याचें सरकारोंनें बंद केल्यामुळें तें उत्पन्न व ती सवंगाई कमी होऊन गोरगरीबांस सुद्धां भारी मोलाचें मीठ (समुद्राचें) थोड थोडकें विकत घेऊन खाण्यांचें भाग पडतें. इकडील मीठ थोडें कडू लागत असे. तथापि गरीबाचे सोईचे होतें

अफू हें पीक जरी इकडील मुख्य पिकापैकीं नव्हेतरी प्रांतांतील तान्ह्या मुलांस पुरे इतकी ( इकडे दोन तीन वर्षें पर्यंत तान्ह्या मुलांस थोडी अफू घालण्याची वहिवाट आहे.) व उत्तम अशी अफू इकडील बागाइतांतून उत्पन्न होतें, पण गेल्या दोन तीन वर्षांत इकडे अफूचा पेरा व उत्पन्न बिलकूल झालें नाहीं तेणेंकरून इकडील अफू उत्पन्न करणारे माळी लोकांस सुद्धां मुलाकरितां बाजारांतून मेळ केलेली घाण अफू पैशाला वाला गुंजे एवढी गोळी घेऊन येणें भाग झालें आहे. व दुसरें असें कीं जिराइताचें मुख्य उत्पन्न जसें (वायदा देण्याचे उपयोगीं पडणारें) कापूस आहे तसेंच बागइतांतील मुख्य उत्पन्नांतील बाब अफू व मिरच्या हीं होत पैकीं अलीकडे अफूचा पेरा अजीच नाहींसा झाला आहे तेणेंकरून बागाईत करणारे लोकांचा मोठा तोटा असून प्रांताचीही एक मोठी उत्पन्नाची बाब कमी झाली असें ह्मटलें पाहिजे.

अफूच्या पेऱ्याविषयीं सरकारांतून मनाई झाल्याविषयीं मागें मी ऐकिलें होतें. मग त्यांत कितूपत् तथ्यांश आहे न जाणो कारण प्रांतांतील उत्पन्नाची बाब सरकार जाणून बुजून कशासाठी बंद करील? आमच्या एथें जवारी उत्पन्न होत असतां तीं पेरू नका व परदेशांतून विकत घेऊन खा असें सरकार कधीं सांगावयांच नाहीं. मग अफू ही विषवल्ली असल्यामुळें तिची मुळी आपल्या प्रांतांत नकोच असें ठरविलें असल्यास सांगवत नाहीं बाहेर प्रांतांतून लखो रुपयांच्या अफूच्या पेट्या एथें येऊन विकल्या जातात व इकडील स्वहस्थें अफू विकविणारे त्यांचीं तोंडें पाहात बसतात. पत्रकर्ते महाराज आपण गरीब शेतकऱ्यांची दाद सरकारांत लावून अफू पेरण्याविषयीं परवानगी देववा तर बागाइताची मोठीच अडचण दूर केल्याचें आमणास श्रेय येईल. विस्तार फार झाल्याची माफी मागतो. कळावें. ता॰ १५ माहे फेब्रुवारी सन १८८० इसवी.

शेतकऱ्याचा एक
"कनवाळु,"

---

**वऱ्हाडसमाचार.**

मिति माघ शुद्ध १२ शके १८०१

---

## धनी व चाकर यांमध्यें कायदा येणार

धनी व चाकर हें नातें सर्वत्र व्यापिलें असून तें केवळ अनादि सिद्धवत् होऊन राहिलें आहे. सुमार तीन वर्षांपूर्वी धनी व चाकर यांच संबंधांत कायदा असावा ह्मणून बूट निघाला होता पण त्यानंतर तो बाहेर आला नाहीं. अलीकडे पुन्हा तो कायद्याचा मसूदा पास होण्याकरितां बाहेर निघाला आहे. आतां धनी व चाकर यांविषयींचे कायद्याची आपले देशांत कितपत अवश्यकता आहे हें पाहिलें असतां उघड दिसतें कीं आज हजारो वर्षें धनी चाकराचें रहाटगाडेंग जसें कायद्यावाचून चालत आलें तसें पुढेंही विनधोक चालेल यांत संशय नाहीं. मग हा कायदा असावा असें मनांत येण्याचें कारण काय असावें तें आह्मांस समजत नाहीं.

उभय पक्षांत बेबनाव आल्यावाचून कायद्याची जरूरी लागत नाहीं व धनी चाकर यांचें पिता पुत्राचें नातें असल्यामुळें त्यांच्यांत बेबनाव होण्याला कारण नाहीं अशीं किंबहुना यापेक्षांही अधिक धनी व चाकरांचे प्रेमाचीं उदाहरणें जुनाट काळचीं व हल्लींचींही पुष्कळ सांपडतील. मारुलक्षासांतील 'श्रेष्ठ व कनिष्ठ यांचो वागणूक, या हेडिंगा खालीं क्रुयांकस आणि त्याचे दास, तसेंच 'एका सेवकाचें औदार्यपूर्वक स्वार्पण या हकीकती वाचल्या ह्मणजे तें धनी व चाकरांचें परस्पर प्रेमभाव पाहून मन साद्रत झाल्यावाचून रहात नाहीं. हे जें उभय पक्षी मोठ्या थोरपणाचें वर्तन घडलें तें कायद्याच्या योगानें घडलें असेल काय? नाहीं! केवळ प्रेमभावानें.

ज्या प्रमाणें चाकरानें आपले धन्याची तनमनधनें करून अनन्यभावें सेवा करावी व प्रसंगीं धन्याचे जीवाकरितां आपले जीवितही धोक्यांत घालावें त्याचप्रमाणें धन्यांनेही आपल्या मुलाप्रमाणें चाकराचे सुख सोयींविषयीं अंतःकरण पूर्वक काळजी ठेवावी मग तेथें कायद्याची काय मातबरी व गरज रहाणार आहे! परंतु अलीकडे धन्यास समूळ पाताळीं घालणारे असें कृतघ्न चाकर व चाकराला टांचेखालीं चिरडून टाकणारे निर्दय धनी कोठें कोठें उत्पन्न होऊं लागल्यानें कांहीं कांचे तरी मनांत हा कायदा असावा असें येण्यास कारण होतें, तथापि अशा विरळा कुरकुरीवरून हा नवीन कायदा करण्याचें सरकारोंने अनुमोदन देऊ नये कारण जेथें चांगलें आहे तेथें वाईटही असतेंच त्यासाठीं सर्व साधारण कायद्याची योजना झाल्यानें कुलीन धनी व इमानी नोकर यांच्यामध्यें जे कांहीं प्रेम व ऐक्य आढळतें तेंही या कायद्याचें योगानें नाहींसें होईल असें वाटतें. तशांतून या हिंदुस्थानांत आधींच दुष्काळ व दरिद्र यांणीं वस्ती केल्यासारखें झालें आहे व पुष्कळ गोरगरीबांची अन्नान्न दशा होऊन राहिली आहे तेव्हां अशा स्थितींत या कायद्याची योजना झाल्यानें गरीब प्रजेचा बराच भाग निर्दय धन्यांचे हातून बळी दिल्यासारखें होईल असे या कायद्यांतील कलमें खालीं दिलीं आहेत त्यावरून वाटतें.

( अ ) जाणून बुजून आणि खोटेपणानें आपले धन्याचे चाकरी पकरणार नाहीं.

( ब ) आपले धन्याची चाकरीवरून जाणून बुजून आणि खोटेपणानें गैरहजर राहिल्यास.

( क ) तो खासगी नोकर असल्यामुळें जो हुकूम त्यास मानणें भाग, असा हुकूम बुद्धिपुरस्कर अमान्य करील.

( ड ) आपला एकादा गैरशिस्त फायदा व्हावा ह्मणून अथवा आपल्या गैरशिस्तपणानें धन्याची मालमत्ता नुकसान होण्यासारखें करील.

( इ ) जाणून बुजून आपल्या धन्याच्या मालमत्तेस इजा करील.

( फ )धन्यास बुद्धि पुरस्सर राग येण्यासारखें वर्तन करील कारण त्याची वर्तणूक नेहमीं मर्यादशील असणें जरूर आहे. अशा वर्तणुकेपासून राग आल्यास व यापासून एखादा गुन्हा घडण्यासारखें वर्त्तन करील तर धन्यानें अगर जो धन्याची घरची व्यवस्था पहात असेल त्यानें या कामाचा अधिकार असलेल्या माजिस्ट्रेटाकडे पंधरा दिवसांच्या आंत फिर्याद करावी.

ज्या खासगी नोकर लोकांच्यानें नुकसान भरून देववत नाहीं. त्यास करार मोडल्याबद्दल फौजदारी शिक्षा असावी व त्यावर स्वतंत्र माजिस्ट्रेट नेमलेले असावे असाही विचार असल्याचें समजतें या कायद्यानें खासगी नोकरांची स्थिति गुलामाचे पायरीची होणार ह्मणजे त्यांस स्वातंत्र्य ह्मणून बिलकूल रहाणार नाहीं ह्मणून बहुतकरून हा कायदा पास होणार नाहीं; कारण आमचे दयाळु इंग्रज सरकारानें पुरातन काळापासून चालत आलेला सुद्धां गुलामांचा व्यापार बंद करविला तेव्हां त्याच धरतीवर जाणारा हा नवीन प्रकार सुरू होऊं नये अशी आशा आहे.

---

### देवस्थानें व दर्गा यांच्या परंपरागत नेमणुका.

आमचे हिंदुस्थान देशांत हिंदु लोकांचीं देवस्थानें व मुसलमान लोकांचे दर्गा यांस जुनाट काळापासून हिंदु वमुसलमान राज्यांतून ज्या नेमणुका करून दिलेल्या आहेत त्या आमचे दयाळु इंग्रज सरकारानें तशाच कायम ठेवून त्यांची नीट व्यवस्था रहावी ह्मणन वारंवार तिकडे देखरेख ठेवित आहे. अलिकडे मुंबईच्या कायदे कौन्सिलापुढें सदहूं नेमणुकीविषयीं नवीन कायद्याचा खर्डा तयार केला आहे. याविषयीं अभिप्राय लिहितांनां आमचे मुंबईकर बंधु ज्ञानोदयकर्ते लिहितात तें असें:—

"ज्याच्या अमलांत अनेक धर्मांची प्रजा आहे अशी प्रत्येक सरकारानें दोन गोष्टीं विषयीं फार जपले पाहिजे. त्या दोन गोष्टी अशा;— प्रजेच्या धर्मांत कोणत्याहि प्रकारें हात घालूनये, आणि स्वतःच्या धर्माविरुद्ध कांहीं करूनये. ह्याविषयीं सरकारानें जपणें अवश्यक व न्याय्य आहे असें सर्व सुज्ञ व सुविचारी लोक कबूल करतील. परंतु ह्या देवस्थानांच्या व दर्गांच्या नेमणुका चालू ठेवल्यानें आमचें इंग्लिश सरकार ह्या दोन्ही निर्बंधांचा अतिक्रम करतें, हें त्यास मोठें लांच्छन आहे, आणि हें फार गैरशिस्तही आहे. कैसर. ई. हिंद सरकारानें दोन वेळां जाहीरनाम्यांकडून असें प्रसिद्ध केलें कीं, आह्मी कोणत्याही प्रकारें आपल्या प्रजेच्या धर्मांत हात घालणार नाहीं. असें असतां त्यांनीं ह्या नेमणूका चालवून ही प्रतिज्ञा कां मोडावी? यास्तव आह्मी आशा करितों कीं, सरकार ह्या नेमणूका बंद करून सदरील लांच्छनापासून व दोषापासून लौकर मुक्त होईल."

आह्मास समजत नाहीं कीं पूर्वीं चालत आलेल्या देवस्थानास व दर्गास नेमणुका चालू ठेविल्यानें चक्रवर्तिनी साहेबांस लांच्छन व दोष कसा लागतो, तसेंच त्या नेमणूका बंद केल्यानें "धर्माचे कामांत हात घालावयाचा नाहीं." हें वृत कसें पाळिलें जाईल? दुसऱ्या पक्षी पाहिलें तरी देखील ह्या नेमणुका बंद केल्यानें मोठासा नफा व्हावयाचा आहे असें नाहीं. उलट धर्मांच्या योगानें बखेडा होण्याचाही संभव आहे तशांतून अलीकडे कित्येक ठिकाणच्या देवस्थानांची व दर्ग्यांची व्यवस्थाही सुरळीत चालू असल्याचें समजतें. आतां कांहीं ठिकाणीं थोडी वाईटही स्थिति आहे तथापि आमचे दयाळु सरकार आह्मास राज्यव्यवस्था जी शिकविणार ती या देवस्थानांच्या व म्युनिसिपालिट्यांच्याच योगानें शिकविणार तेव्हां इकडूनही ह्या नेमणुका कायम ठेवणेंच इष्ट दिसतें.

---

पुष्पगुच्छ या नावाचें. मराठी मासिक पुस्तक गेले जानेवारीपासून निघू लागलें असून त्याचे कर्त्यानें पहिला अंक आह्माकडे पाठविला आहे तो आह्मी स्वीकारून ग्रंथकर्त्यांचे आभार मानितों. या पुस्तकांत अनेक विषयांचें विवेचन येईल. या पुस्तकाची द्वापशपत्री साचा असून पृष्ठे ६४ आहेत. छापणी शिळेची आहे तथापि ती टाइपाची कीं शिळेची हें ओळखण्यास पंचाईत पडते इतकी सर्वोत्कृष्ट आहे. पहिले अंकांत महत्व, चित्रकला, फोटोग्राफी बुद्धिबळाचा खेळ, व कशिदा हे विषय प्रस्तावने दाखल दिले आहेत अशा मनोवेधक विषयांवर प्रसिद्ध होणारें हें पहिलेंच पुस्तक असल्यामुळें गुण ग्राही लोकांनी संग्रह करण्यास योग्य होऊन ग्रंथ

कर्यास चागलें सहाय्य मिळो असें आह्मी इच्छितो. या पुस्तकाची वर्षाची वर्गणी ४८६ असून हें मुंबई एथें जगदीश्वर छापखान्यांत छापलें जातें. या उपयुक्त पुस्तकास चांगला लाकाश्रय मिळून चिरायु होवो असे आह्मीं इच्छितों.

## वऱ्हाड.

हवामान—गेले आठवड्यांत प्रथम एक दोन दिवस वारा मोठ्या सुसाट्यानें वाहत असे. नंतर एक दोन दिवस अभ्रें आलीं, लागलींच दोन तीन दिवसांनीं तीं नाहींशी होऊन गारवारा व कडक थंडी पडू लागली व काल परवापासून पुन्हा थंडी कमी होऊन अभ्रे येऊं लागलीं आहेत. हें दोन दोन दिवसांत फेरबदल होणारें. थंडी वारे या आठवड्यांत काशीपासून रामेश्वरपर्यंत एक सारखें होतें असे चोहोंकडील वर्तमानपत्रांवरून समजतें. प्रयाग, काशी वगैरे ठिकाणीं तर एक दोन दिवस झड व पाऊसही होता असे समजतें तरी आतां एथून थंडीचा शेवट व उष्णतेचा आरंभच समजला पाहिजे. गावांत लग्नें व मुंजी यांची गर्दी चालू आहे.

अंजनी खूर्द तालुके मेहेकर एथें एका बाईला कन्या झाली तिचें सर्व शरीर मानवी असून तोंड तेवढे वानरासारखें आहे असें तिकडील एक फिरस्ता कळवितो. मग यांत किती तथ्यांश आहे न जाणो. कारण साधण तरी वानराचा चेहरा मनुष्याचे चेहेऱ्याशी पुष्कळ साम्यता ठेवितोच. त्यांत हें कदाचित अधिक साम्यता ठेवित असेल.

रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर यांचे चिरंजीवाची मुंज व कन्येचा विवाह हीं दोन कार्यें मूर्तिजापुरें एथें गेलें आठवड्यांत झालीं असें समजतें.

रा. रा. भास्करराव सखाराम अयवंत जु. क. चे क्लार्क आफ धि कोर्ट हे आपले चिरंचिवांचे लग्नकार्या प्रीत्यर्थ २० दिवसांची रजा घेऊन गेले बुधवारीं मुंबईस गेले.

मे. जुडिशियल कमिशनर साहेब बहादूर यांची स्वारी गेले शनिवारीं एथें आली व आज रोजीं त्यांचे पुढें अगरचा सेशन मुकद्दमा चालणार आहे.

मागील आठवड्यांत घोड्याचे शर्यतीकरितां एथून मि. किट्स साहेब असिस्टंट कमिशनर, मि. हेर साहेब असिस्टंट कमिशनर व डाक्टर ह्यूम साहेब सिव्हिल सर्जन हे गेले होते ते या आठवड्यांत परत आले.

मे. पोलिस सुप्रिंटेंडेंट साहेब यांची स्वारी खामगावाकडे असल्यानें कळतें.

मे. बाहुदीनखा साहेब मोंगलाईंतील परभणी एथील अव्वल तालुकदार गेले आठवड्यांत एथें आले होते त्यांजबरोबर परभणीचे पोलिस इन्स्पेक्टरही आले होते त्यांनीं एथील सरकारी कामकाजाची रीत मात वगैरे पाहून शेनिवारीं परत गेले.

सालाबाद प्रमाणें या आठवड्यांत पातुरची यात्रा सुरू झाली आहे. चहूकडून व्यापारी लोक माल आणून दुकानें लावण्याची योजना झाली आहे. ही यात्रा बाजारचे व व्यापाराचे संबंधानें अजून १५।२० दिवस चांगली चालू राहील असें वाटतें.

कालिदास नाटककार मंडळीनें गेले बुधवारीं इंद्रजीत व सुलोचना आख्यान व शनिवारी कर्णपर्व हे खेळ केले. यांच्या आख्येप्रमाणें पडदे सीन वगैरेंत दिवसेंदिवस यांची अधिकाधिक सुधारणा होत आहे. शनिवारचेही खेळांत नेहमींप्रमाणें समयीचा नाच; तलवारीच्या फेंका, विस्तीर्ण भाषणांचें प्रकार हे रगड झाले. शैल्य, कर्ण, कोंती, अर्जून, कृष्ण व यांनीं आपापलीं कामें उत्तरोत्तर बरीं केलीं. उशिरा आरंभ व भाषणाचा विस्तार झाल्यामुळें ५ बाजतां खेळ आटोपला फार्स मुळींच झाला नाहीं. खेळ बरा झाला.

अकोला म्युनिसिप्यालिटीचे पुढील सालचें बजेट तयार झालें आहे तें असें:——

| जमा | रु० |
|---|---|
| पोलिस पट्टी | २५०० |
| मेहेतर पट्टी | ३००० |
| बाजारसेस | २००० |
| काटनसेस | १००० |
| स्लाटरहौस फी | ५०० |
| कचरा विक्री | ४५० |
| जागा भाडें | ४०० |
| गवत विक्री | ३०० |
| दंड | ३०० |
| कोंडवाडा उत्पन्न | २०० |
| डिस्पेन्सरी वर्गणी | २०० |
| किरकोळ | ३०० |
| | ११९५० |
| मागील शिलक | ३५०० |
| | १४६५० |

| खर्च | |
|---|---|
| ओरिजिनल बर्क्स | २२०० |
| रिपेरी | २४०० |
| इस्टाब्लिशमेंट | ८६६३॥ |
| आफिस | १३४४ |
| कान्सरव्हन्सी | ३४२० |
| काटन मार्केट | ४६८ |
| पोलिस | १६४३॥ |
| डिस्पेन्सरी | ९१२ |
| मुलींची शाळा | १५० |
| व्याक्सिनेशन | १८८ |
| बेडरस्कूल | १२० |
| सादिलवार | ४१८ |
| | ८६६३॥ |
| | १३२६३॥ |
| बाकी शिलक | १३८६॥ |
| | १४६५० |

या शिवाय म्युनिसिप्यालिटीनें ल्याट्रिन सेस अथवा हौस कन्सरव्हन्सी सेसची मंजुरात मागितली आहे. त्यांचं सांगशन मिळेल तर ४००० रूपये जमा वाढेल व त्यांतून खालीं लिहिलेला खर्च केला जाईल.

| | |
|---|---|
| पब्लिक ल्याट्रिन बांधण्याकडे | २००० |
| वाटरसप्लायकडे | १००० |
| कचऱ्याचे गड्डे बांधण्याकडे | ५०० |
| अधिक भंगी ठेवण्याकडे | ५०० |
| | ४००० |

उमरावतीसही अकोल्याप्रमाणें मित्रसमाज स्थापन झाला असें समजतें. प्र. सिं.

गेले आठवड्यांत जळगांव जामोद येथें रामभाऊ माजी मास्तर ह्यांचे घरीं घरफोडी होऊन २००० रुपयांचा विषय चोरीस गेला. तसेच मांजरी ता० बाळापूर येथेंही २००० रुपयांची एक घरफोडी झाली. पोलिसतपास चालूं आहे.

मि. एच. इ. जे. फिट्झ् प्याट्रिक आफिसिएटिंग एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर ह्यांना हैदराबाद अमानी मुलुखांत तिसरे क्लासचे माजिस्ट्रेटचा अधिकार मिळाला.

उमरावती येथील स्मालकाज कोर्टाचे जड्जांस दिवाळे निघालेल्या लोकांच्या तंट्याचे निकाल करण्याचे संबंधानेंही जड्जाचा अधिकार मिळाला असें समजतें.

चिमी मर्द विठोबा राहणार देवरी तालुके अकोट इनें एक जिवंत मुलगी पंचगव्हाणास गावाबाहेर टाकिली होती. पोलिसास ती खबर मिळाल्यावरून तेल्हाऱ्याचे तेव्हांचे ची. का. मि. नरसय्या ह्यांनीं चवकशी केली. सदरहू बाईवर मे. डे. क. साहेबापुढे ३१७ कलमा प्रमाणें मुकद्दमा होऊन तीस ६ वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

भयंकर आग—उमरावतीस गेल्या मंगळवारीं रात्रीं बोहरीबाजारांत आग लागून २६ दुकानें जळालीं. ज्या ठिकाणीं ही आग लागली ती गल्ली इतकी अरुंद आहे कीं एकिकडच्या दुकानाच्या आगीच्या ज्वालामुळें समोरील दुकानांनीं सहज पेट घेतला असेल. आळींत बहुतेक दुकानें बोहोऱ्यांचींच होतीं व तीं देखील जुन्या चालीचीं बांधलेलीं असल्यामुळें विझविण्याचा प्रयत्न कांहीं चालला नाहीं. सरासरी लाख दीड लाख रुपयांचें नुकसान झालें असावें असें कळतें. उ.

## जाहिरात.

सर्व साहुकार लोकांस व आमचे दुकानचे आसामी लोकांस वगैरे मी खालीं सही करणार या जाहिरातीनें कळवितों कीं, गोपालदास गुजराथी बाळापुरकर वगैरे चार इसमांनीं मजपासून कपटानें भुलथाप देऊन माझी वीस हजार रुपयांची इस्टट ५००० रुपयांत खरीदखत तारीख २७ माहे सेप्टेंबर सन १८७९ इसवीचें करून घेतलें असून मुबदलाही दिला नाहीं व मजबरोबर सदरील चे मनुष्यांनीं कपटाचें वर्तन केल्यामुळें माझे अब्रूस धोका बसला आहे. करितां त्यांणीं ह्मणजे गोपालदास गुजराथी याणीं मजपासून जे कपटाचे दस्तैवज करून घेतले आहेत ते रद्द आहेत. मी माझे दुकानचा मालक असून सर्वत्र साहू लोकांचा निकाल करण्यास तयार आहे साहुकाराच्या ज्या बाक्या मजकडे निघतील ते हिशेब माझे मुखत्याराशी रुजुवात करून घ्यावी व माझे दुकानची उधारी ज्याजकडे आहे त्यांनीं तो पैसा मजपाशीं अगर माझ्या मुख्त्याराकडे द्यावा याशिवाय दुसरे कोणास दिला तर मजरे मिळणार नाहीं. व त्या दस्तैवजावरून गोपाल्दास वगैरे यांणीं मजवर दावा वगैरे केल्यास त्याचा मी देवाल नाहीं ते रद्द आहेत हें सर्वत्रास जाहिर व्हावें करितां ही जाहिरखबर दिली आहे. कळावे. ता. २१ फेब्रुवारी १८८० इसवी.

(सही) रामचंद तुळजाजी बोथेकर
दुकान बाळापुर दस्तुर गोविंद माधव कुलमुख्त्यार

नोटिस.

गोपाळ दास गुजराथी व गुरुप्रताप मारवाडी व साहेबराम मारवाडी व खुशालराम मारवाडी राहणार बाळापुर यांस

खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी चवघांणीं मजला भुलथाप देऊन कपटानें मजपासून दस्तैवज खरीदखत रुपये ५००० हजार रुपयाचें तारीख २७ माहे सप्टेंबर सन १८७९ इसवीचें करून घेतलें असून त्याचा कांहींच मजला मुबदला वगैरे दिलाही नाहीं. व जे तुह्मी मजबरोबर दिले ते तुह्मी कपटाचें वर्तन केल्यामुळें माझे अब्रूस धोका बसला आहे आतां तुह्मास सूचना करण्यांत येतें कीं तुमचे जवळ माझे दस्तैवज असलेले निरुपयोगीं आहेत व ते रद्द समजावे. तुमचे वहिखात्यावरून जें माझे दुकानाकडे तुमचें घेणें निघेल तें चार साहूच्या रीतीप्रमाणें तुह्मी आपला निकाल करून घ्यावा व हिशेब नोटिसाचे तारखेपासून आठ दिवसांत माझा मुखत्यार याजपाशी दाखवून रुजू करून घ्यावी व माझे कांहीं रुपये तुमचेकडेस वसूल आले असल्यास ते दाखल करावे. व माझी उधारी वगैरे तुह्मी वसूल करूं नये. केल्यास सरकारमार्फत तुमचेवर तजवीज करणें मजला भाग पडेल. व हे दस्तैवज कपटाचे आहेत अशाबद्दल मी कोर्टांत अर्जानें कळविलें आहे त्या दस्तैवजावरून तुह्मी मजवर कोर्टांत फिर्यादी वगैरे केल्यास मी जबावदार नाहीं ही तुह्मास सूचना केली आहे. ते दस्तैवज रद्द आहेत व याजबद्दल सर्वांस समजण्याकारितां जाहिरातीनें खबर दिली आहे. कळावें तारीख २१ माहे फेब्रुवारीं सन १८८० इसवी.

(सही) रामचंद तुळजाजी बोथेकर
दुकान पेठ बाळापुर दस्तुर गोविंद माधव
देशपांडे कुलमुखत्यार.

## वर्तमानसार.

रेवाचे महाराज रघुराज सिंव्ह बहादूर जी. सी. एस. आय. हे या चालू महिन्यांत स्वर्गवासी झाल्याचें दुःखकारक वर्तमान तिकडील पत्रावरून समजतें. यांच्या मरणानें तिकडील प्रजा विशेषें करून यांस जाणणारे तेवढ्यांस दुःख झाल्यावांचून राहणार नाहीं. हे स्वतां चांगले कवि असून त्यांनीं 'रामस्वयंवर' इत्यादि अनेक प्रकारचे ग्रंथ रचलेले आहेत ह्मणून रसिक कविजनांस यांचे मरणानें वज्रपातातुल्य दुःख झालें आहे असें कविवचनसुधाकर्ते लिहितात. महाराजांचे मागें माहराजांचे अल्पवयस्क चिरंजीव आहेत तेही आपल्या वडिलांचे कीर्तीप्रमाणें प्रख्यातीस येवोत असें आह्मी इच्छितों.

याकुबखानास निलगिरीस पाठविचा विचार फिरला असें कळते.

फ्रान्स देशांतील ६० लक्ष एकर जमीन दारू पिकविण्याकडे असून, त्यांतून दरसाल ८० कोट रुपयांची दारू उत्पन्न होते व या दारूचा खप सर्व युरोप खंडभर होतो असें एक बातमीदार लिहित असतां ह्मणतो कीं,

तिसऱ्या जार्जाच्या वेळेस जो दारूचा खप होत असे त्याच्यापेक्षां हल्लीं दारूचा खप फारच कमी होऊं लागला आहे व याचें कारण युरोपांतील लोक दिवसें दिवस भिकारी होत चालले हें असावेंसें वाटतें ! ! दारूचा खप कमी होतो यावरून तिकडील लोक व्यसनापासून दूर होऊं लागले आहेत हें ह्मणणें त्यास जास्त शोभलें असतें. बरें, युरोपखंडांतील लोक भिकारी होत चालले व एशियांखंडांतील तर झालेच आहेत, मग नगांतील द्रव्यरूपी लक्ष्मी गेली कोठें? आमच्या शास्त्राप्रमाणें आपल्या माहेरघरीं ह्मणजे समुद्रांत तर गेली नाहीं!

विगतपुरी एथील वाघ्याचा उपद्रव अमळ शमला आहे असें कळतें.

गेल्या मंगळवारीं ठाणें एथील तुरुंगांतून ४९ कैदी काळ्या पाण्यावर पाठविण्याकरितां मुंबईस रवाना झाले.

रेल्वेच्या गिम्टिा उघडीं तोंडें ठेवून पोस्टांतून पाठविल्या असतां १० तोळ्यापर्यंत अर्ध्या आण्यांत जातील असा पोस्टाकडे ठराव झाला आहे.

एका युरोपियन गृहस्थानें एका बाईशी लग्न लावण्याचें कबूल करून विलायतेस परीक्षेकरितां गेला व येतांनां एका तिकडीलच बाईशी लग्न करून आला यावरून ठरलेल्या पहिल्या बायकोनें त्याच्यावर मुंबईस नुकसानी बद्दल १४,००० रुपयांची फिर्याद केली आहे.

लंकेंत (सिलोन) दरवड्यांचा उपद्रव सुरूं असून इकडच्या प्रमाणें बक्षीस लावून दरवडेखोर पकडण्याचा सपाटा सुरूं आहे.

अमदाबादच्या फीमेल ( बायकी ) ट्रेनिंग कालेजावरील मुख्य बाई मिस कोलेट यांची गुजराथींत हायर स्ट्यांडरची परीक्षा उतरली.

वायव्य प्रांतांत डाके पडण्याचा सपाटा सुरू झाल्याचें कळतें गेल्याच्या मागील गुरुवारीं सितापुरच्या एका गाडीवर चोरट्यांनीं हल्ला करून त्यावरच्या उतारूंचे हाल करून डाकेचा गट्ठा घेऊन चालते झाले. ह्या दिवशीं खैरीघरचा राजा ३०,००० रुपये बरोबर घेऊन त्या डाकेच्या गार्डींत बसून जाणार होता या ऱ्यागावर चोरट्यांनीं स्वारी केली पण नशीबानें राजा दुसरे दिवशीं गेल्यामुळें यांचा बेत फसला असें ह्मणतात. अ. द.

कलकत्ता एथें बाबु तारिणी प्रसाद यांच्या उद्योगानें संस्कृत भाषेंतील सर्व प्राचीन ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा विचार करून हें स्तुत्य काम लवकरच सुरूंही होणार व प्रथमतः वैद्यक ग्रंथास छापण्यास सुरवात होणार असें समजेंसे. या बाबुंच्या प्रयत्नास लोकांची साहायता मिळून यश येईल तर लोकांचें सुदैवच समजलें पाहिजे. ज्यास मदत करणें असेल त्यांनीं कलकत्ता एथें 'भारतरत्नोद्धार' आफिसांत वरील बाबूंच्या नांवें पत्रव्यवहार करावा असें सदर्हू बाबू कळवितात.

सिमला—एथील म्युनिसिपल आफिस व इतर पुष्कळ दुकानें यांस आग लागून तीं सबंध जळलीं. एकंदर नुकसान दीड लाखाचें झालें असा आजमास आहे.

काबुलच्या वाटेवर फौज जात असतां वाटेंत कोणी आजारी पडल्यास त्याच्याकरितां जागोजाग दवाखानें ठेवण्यांत आले आहेत.

नगर तालुक्यापैकीं निंबगाव वाघा एथील कुळकर्णी नारायण गंगाधर यानें सरकारी दप्तरीं हिशेबांत खोटे कागदपत्र केल्यामुळें त्यास इतःपर कोठेंही सरकारी नोकरी मिळूं नये ह्मणून ठराव झाला आहे.

दरवडेखोर तुकाराम हैबती यास नगर पोलिसानें निजामचे हद्दींत पकडलें, पण तो कैदेंतून पळाला. त्यास पकडण्याकरितां १००० रुपये बक्षीसीचा जाहिरनामा लाविला आहे. इं. प्र.

काबुलांत गेले सोमवारीं धरणीकंपाचा धक्का मोठा बसला. शिरपुर छावणींतील इमारतींस इजा पोहचली नाहीं. मात्र बालाहिसार किल्ल्याची एक भिंत पडली येणेंकरून सहा गुरखे शिपायांस इजा झाली याचें तारीख ११ च तारेवरून समजतें.

पोर्तुगीज सरकारचें नाणें इंग्रज सरकारच्या नाण्याप्रमाणें रु. आ. पै. असें होणार असून ते इकडेसही लागू करणार असें बां. ग्या. वरून समजतें.

वरद्वानचे महाराजांचा इंग्लंडास जाण्याचा बेत तूर्त राहित झाल्याचें कळतें.

गेले सोमवारीं अलाहाबाद एथें पाऊस पहला तेथें पावसाची जरूरीच होती.

नवानगर एथें मोठी पाण्याची तूट आली आहे करितां नवीन विहिरी बांधण्याचें काम जारीनें चालू आहे.

कलकत्त्यांतील माजी नवाब अमीरअली यांचे कनिष्ठ चिरंजीव इंग्लंड एथें विद्याभ्यास करीत आहेत त्यांस पुढील सालीं सिविल सर्व्हिसची जागा देणार अशी बोलवा आहे.

पुढील सालीं मनुष्यगणती होणार त्या कामावर बंगाल कडील मि. एलियट साहेबांची नेमणूक होणार असें समजतें.

मद्रास इलाख्यांतील रेल्वेकडील नोकर लोक इंडिया सरकारास स्टेट रेल्वेच्या शर्तीप्रमाणें सेविंग ब्यांक स्थापन करण्याकरितां अर्ज करणार आहेत असें कळतें.

सन १८७९ सालांत हिंदुस्थानांत परदेशांतून सोनें व रुपें एकंदर ८९२३६६३२ रुपयांचे आलें व ३३२७५५६४ रुपयांचें परदेशांत गेलें असें मद्रास नेटिव ओपिनियन वरून समजतें.

अहमदनगर जिल्ह्यांत भील लोकांनीं दंगा सुरू केला आहे याजकरितां पुण्याचे पोलिस सुप्रिंटेंडेंड मेजर ड्यानियल साहेबांनीं रामोशाची टोळी पोलिस अधिकारी बरोबर देऊन मदतीकरितां पाठविल्याचें समजतें.

कुरम एथें चार इंच जाडीचा बर्फाचा थर पडला व ता. ८ रोजीं जबरदस्त धरणीकंपाचा धक्का बसला. ने. ओ.

## मुलांची जतन व त्यांचें पोषण.

मुलांची जतन व त्यांचें पोशण या विषयाच्या संबंधानें आमच्या लोकांस बहुतेक कांहींच माहिती नाहीं असें ह्मटल्यास चिंता नाहीं. आतां कोणी ह्मणतील कीं जतन व पोषण यांत असा काय मोठा बाऊ आहे! आह्मी जतन व पोषण करितों त्यास कोणी दोष लावण्यासारखा नाहीं. परंतु हा भ्रम आहे. जतन व पोषण ह्मणजे नुसतें खाऊं जेऊं घालून ज्या प्रकारें मुलें चांगलीं पोसतील अशी त्यांची काळजी घेणें इतकेंच नव्हे. जनत व पोषण हे शद्ब फारच गूढ आहेत. चांगले समंजस व मोठे ज्ञाते ह्मणविणाऱ्या आमच्या लोकांतही या विषयाचे खरे तत्व थेडेच आढळतील. खाऊन पिऊन चार पैसे बाळगून असणारे वडे लोक ही या विषयाकडे फारच दुर्लक्ष करितात. मग गरीबगुरीबांच्या तर ही गोष्ट स्वप्नीं देखील बसत नसेल एकंदरींत अशा विषयाच्या संबंधानें आपले लोक थोड बहुत अज्ञच ह्मटले तरी चालेल.

जतन आणि पोषण या दोन शद्बांत जो गंभीर अर्थ आहे त्या अर्थाचें विवेचन करण्यामध्यें कित्येक परदेशी वक्त्यांनीं फारच श्रम व वेळ खर्च केला आहे त्या लोकांचें ह्मणणें असें आहे कीं मुलाची काळजी ते मातेच्या उदरांत असल्यापासूनच सुरू होते व ती मूल चांगलें अठरा वीस वर्षांच्या वयाचें होई तेंपर्यंत अधिकाधिक वाढत जाते. मूल पुढें जन्मणार तर त्याच्या तयारीस अगोदर पासून लागलें पाहिजे. त्याच्या आईची चार पांच महिन्यांची गरोदर झाल्यापासून प्रसूतिकाळपर्यंत फार चांगली शुश्रूषा ठेविली पाहिजे, तिच्या खाण्यापिण्याची विशेष तजवीज ठेविली पाहिजे व तिला कोणत्याच प्रकारें बाह्य किंवा मानसिक त्रास होऊं देतां नये. प्रसूत होण्याची जागा फार स्वच्छ असून चांगली हवा आंत खेळे अशी असावी. पहिल्या महिन्यांत फारच जपलें पाहिजे. तिची व मुलाची कपड्यांच्या संबंधानें चांगली सोई करून दिली पाहिजे. स्वच्छपणा हा मुख्य मुद्दा आहे. याकरितां कपड्यांचा पुरवठा फारच चांगला असला ह्मणजे कपडे वरचेवर बदलावयास मिळतात. मुलास अस्वच्छ स्थितींत मुळींच राहूं देतां कामास नये त्याचे कपडे वरचेवर बदलून त्यास नेहेमीं स्वच्छ ठेविलें पाहिजे. हें काम पहिल्या महिन्यांत आई शिवाय दुसऱ्या कोणी तरी घरांतील अगर तशाच अन्तःकरणाच्या स्त्रीनें पाहिलें पाहिजे. बाळंतिणीचे कोणत्याच प्रकारें हाल होऊं देतां नये. अशा प्रकारें एक महिना गुदरल्यावर मग फारशी भीति राहत नाहीं; तथापि जपण्याचें काम कमी होत नाहीं. मुलास या वेळापासूनच स्वच्छतेची सवय लाविली असतां बरें होईल. त्यास स्वच्छपणांत राहण्याची जन्मतःच सवय असली तर तें घाणेरडें निघावयाचें नाहीं.

परंतु अशा प्रकारें सवयी होण्याचा संभव आमच्या लोकांत फार कमती. आई फार अज्ञान असल्यामुळ यांतील दहावा हिशानेंही तिच्यानें आपल्या स्वतःहाला अगर अपल्या मुलाला स्वच्छ ठेववत नाहीं. स्वच्छपणा ह्मणजे काय पदार्थ आहे हें पुष्कळांस माहित नसतें. मुलाचे कपडे स्वच्छ ठेऊन त्याच्या अंगाखालील अगर अंगावरील कपडा ओला होऊं न देणें फारसें कठीण नाहीं, परंतु आमच्या स्त्रियांच्यानें तेंही होत नाहीं. एकदा किंवा चारदा कपडे बदलण्यानें काम होत नाहीं. तर नेहमीं कपडा पाहिला पाहिजे. मुलास जसजसा समज येत जाईल तसतशी त्यास स्वच्छपणाची गोडी लावावी. मूल चार सहा महिन्यांचें झालें ह्मणजे त्यास कांहीं अमुक एक प्रकारची खूण केली ह्मणजे अमुक व्यापार करावयाचा हें सवईच्या योगानें समजूं लागतें. त्यास भीतिदर्शक शब्द अगर खुणा अगदीं करूं नयत; अशानें मूल भित्रें होतें. स्वच्छंद त्यास खळूं, रांगूं, बागडूं द्यावें, धुळींत किंवा जमीनीवर मात्र लोळूं देऊं नये. त्याचे कपडे नेहमीं स्वच्छ ठेवावे. मलीनता हा एक रोगच आहे असें ह्मटलें तरी चालेल. याकरितां तिला जितकें दूर ठेववेल तितकें ठेवावें.

याप्रमाणें स्वच्छतेचे वगैरे नियम राखावे. तसेंच खाण्यापिण्याचेही. बहुतेक आयांचा असा समज आहे कीं, आपल्या मुलानें पुष्कळ खाल्लें ह्मणजे चांगलें पुष्ट होईल. परंतु ही चूक आहे. जसा अगदीं थोडें खाल्यानें अपकार होतो तसाच अधिक खाल्यानें ही अपकार होतो; याकरितां आहार फार नियमित ठेविला पाहिजे. अमुक वेळांच मुलास जेवूं घालावें अगर अमुक वेळांच त्यास खाऊं द्यावें; त्याचे बाहेर जेवूं किंवा खाऊं घालूं नये. हा नियम फार महत्वाचा आहे, परंतु त्याकडे आमच्या स्त्रिया व पुरुष देखील अगदी दुर्लक्ष्य करितात. हा नियम पाळल्यानें सहसा मुलें रोगी निघावयाचीं नाहींत. परंतु उलटीं सशक्त व निरोगी निवटतील.

तसेंच मुलांस वाईट संगतीपासून फार जपलें पाहिजे, नाहीं तर फारच नुकसान व्हावयाचें. वाईट संगती पेक्षां मुळींच संगत नसलेली पुरवली. मुलांस एकदा वाईट संगत जडली ह्मणजे ती सुटणें महा कठीण.

तद्वतच मुलास कोणतीही वाईट सवय लागं देऊं नये. एकदा वाईट सवय हा शत्रु जडला ह्मणजे तो पाठ पुरवितो व पुढें ज्यास तो जडेल त्यास आपल्या सारखे केल्या खेरीज कधींही सोडणार नाहीं.

जतन व पोषण यांमध्यें गृहशिक्षणाचाही अंतर्भाव होतो. चांगल्या प्रकारें जतन करणें व पोषण करणें ह्मटलें ह्मणजे त्यांत शिक्षण यावयाचेंच. परंतु या उपांगाच्या संबंधानें एकदोनदां याच द्वारें उल्लेख झाला आहे. तथापि त्या उपायाच्या संबधानें विशेष एक गोष्ट सांगावयाची आहे ती ही कीं, धर्म संबंधाच्या शिक्षणाकडे लोक फारच दुर्लक्ष्य करितात. आपण कोणताही सत्यमार्ग स्वीकारितों त्यांत आह्मी अमच्या मुलांस कांहींच मार्ग दाखवीत नाहीं. जर आपली खात्री आहे कीं, आपला मार्ग सत्य आहे, तर मग आपलीं मुलें, जीं आपणास या सृष्टीमध्यें उत्तम रत्न आहेत व ज्यांच्या संबंधानें आपण जें काय करावें तें थोडेंच, त्यांस आपण आशा गोष्टीविषयीं अज्ञान ठेवावें हें श्लाघ्य नव्हे. आपण त्यांस इतर गोष्टींमध्यें सत्याचा मार्ग दाखवणारे, त्यांचीं सर्वोपरी काळजी घेणारे व त्यांचें बरें मागते आहोंत; तर मग त्यांस धर्माच्याही मार्गास लावण्याचें आपलें काम आहे. याकरितां प्रत्येक समाजिकानें मन्दिरांत उपासना होते त्या ठिकाणीं तर मुलांस न्यावेंच, पण आपल्या घरींही दिवसांतून एकदा तरी सत्यमार्ग त्यांस दाखवावा आैपासनिक अन्न त्यांस घालून त्यांचे मनाचें पोषण करावें व तीं उत्तरोत्तर त्या गोष्टीकडे लक्ष्य लावून आपला तारणोपाय पाहतील अशी त्यांस सरणी लावून द्यावी; ह्मणजे ज्याप्राणें त्यांचें आपण ऐहिक कल्याण करितों तसेंच पारमार्थिक कल्याणही केल्यासारखें होईल. सु० पं०

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.